❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews
७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# 'ग्रोथ इंजिन'ला 'एमएसएमई'ची ताकद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : ४९ 'एमएसएमई'च्या सामंजस्य करारातून २,३२० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित

- चाकण-भोसरीच्या औद्योगिक भरारीला नवी झेप
- उत्पादनवाढीसह रोजगारांच्या संधी

■ मुंबई (दै. संध्या)

चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणाऱ्या ४९ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसोबतच्या (एमएसएमई) सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२०.९७ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेला आणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी उद्योग (गुंतवणूक व सेवा विभाग) आणि मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे अवर सचिव विनोद मेंढे, आयुक्त (एमएसएमई) प्रेरणा देशभ्रतार, विशेष आयुक्त (मैत्री) वैभव वाघमारे तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' असून, देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात राज्याची भूमिका महत्त्वाची आहे. मोठ्या उद्योगांसाठी आवश्यक घटक, सुटे भाग, सेवा आणि विविध उत्पादनांचा पुरवठा करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीत एमएसएमई क्षेत्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मोठ्या उद्योगांच्या विस्तारामागे एमएसएमई क्षेत्र मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे आणि परिसरातील ऑटोमोबाईल व अभियांत्रिकी उद्योगांच्या परिसंस्थेत एमएसएमई उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. अनेक उद्योग आपल्या घटकांची आणि सेवांची मोठ्या प्रमाणावर स्थानिक एमएसएमईकडून खरेदी करतात. अनेक उत्पादनांच्या आयातीला पर्याय निर्माण करून 'लोकल टू ग्लोबल' वाटचालीला चालना देण्याचे काम एमएसएमई क्षेत्र करत आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या वाटचालीत आज आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला.



# आम्ही रेल्वे फिरू देणार नाही, विमानं उडू देणार नाही : जरांगे पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षण आणि कुणबी जात प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरुन उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील पुन्हा आक्रमक झाले असून 29 ऑगस्ट रोजी त्यांनी उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. तसेच, गरज पडल्यास पुन्हा एकदा आपला मोर्चा मुंबईच्या दिशेने वळवणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, दक्षिण मुंबईतील आंदोलनांसाठी राज्य सरकारने नवे नियम लागू केले आहेत. आझाद मैदानाव्यतिरिक्त दक्षिण मुंबईतील अन्य कोणत्याही ठिकाणी आंदोलन, धरणे किंवा मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. मराठे मुंबईत जाणार आहे, त्यामुळे मुद्दामहून सरकारने हे केलं, यात झाकून ठेवण्यासारखं काहीच नाही, असे म्हणत जरांगे पाटील यांनी सरकारला लक्ष्य केलं.

सरकार विरोधात जात आहे, लोकांनी यांना सत्तेवर बसवले, मराठ्यांनी यांना सत्तेवर बसवले. मात्र, त्याच गोरगरीब मराठ्यांना मुंबईत येण्यापासून रोखणं म्हणजे विरोध वाढण्याचे कारण फक्त सरकार आहे. कायदा तुमच्या हातात आम्ही देतो, सत्ता आम्ही तुमच्या हातात देतो आणि तुम्ही त्याचा गैरवापर करता. लोक यासाठी तुम्हाला निवडून देतात की, आपण कसल्याही परिस्थितीत मुंबईला जरी गेलो, तरी आपलं सरकार तिथे आहे. आपले फडवणीस, आपले शिंदे, आपले दादा तिथे बसले आहेत. जे आपले म्हणून बसवले तेच मुंबईत येऊ नका म्हणतात, ही खूप मोठी दहशत झाली. ही सरकारची दादागिरी झाली, ही चालत नसते असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. आमच्यापुढे दादागिरी करायची नाही. मग, आम्ही मुंबईत सगळीकडं आंदोलन करत असतो, विरोध केला तर रेल्वे फिरू देणार नाही, तुमची विमानं उडू देणार नाही. आम्ही कुणाला मोजत नसतो आणि ऐकतही नसतो. आम्ही कायद्याचा सन्मान करतो, आम्ही तुम्हाला परवानगीचा अर्ज दिला आहे. तुम्ही परवानगी द्या, नाहीतर नका देऊ. मी जात असतो, आमचं जायचं ठरलं तर मी जाणार, रात्रंदिवस बसणार तुम्ही काय करणार ते आम्ही बघणार? तुम्ही मुंबईत कसे अडवतात हे पण बघतो, असे म्हणत मनोज जरांगेंनी मुंबईत आंदोलन करणारच अशी ठाम भूमिका मांडली.



## थोडक्यात...

### नेपाळ येथे अडकलेल्या नागरिकांसाठी मदत

मुंबई (दै. संध्या) :

नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, तेथे विविध देशांतील व राज्यातील अनेक पर्यटक अडकले आहेत. या अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करण्यासाठी आणि त्यांना तात्काळ आवश्यक ती मदत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (मंत्रालय, मुंबई) यांच्यातर्फे खालील लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे: माहिती नोंदवण्यासाठी लिंक: https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf/ नागरिकांना आवाहन – जर नागरिक किंवा पर्यटक नेपाळमध्ये अडकले असतील, तर त्यांच्या कुटुंबातील सदस्य किंवा नातेवाईकांनी वरील लिंकवर जाऊन त्यांची सविस्तर माहिती भरावी. ◻ 1077 (टोल फ्री) नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

### दुसऱ्या हप्त्यात शेतकऱ्यांना ४१२.४८ कोटी

अहिल्यानगर (दै. संध्या) :

राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील दुसरा हप्त्यामध्ये जिल्ह्यातील ४१ हजार १७३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४१२ कोटी ४८ लाख ८८ हजार ५३२ रक्कम वर्ग करण्यात आली आहे. पहिला व दुसऱ्या अशा दोन हप्त्यात आतापर्यंत जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १ लाख २ हजार ५६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९७६ कोटी तर राष्ट्रीय व व्यापारी बँकांच्या १२ हजार ६५२ शेतकऱ्यांच्या खात्यावर १३८ कोटी असे एकूण अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ११४ कोटी रुपये जमा झालेले आहेत. सहकार खात्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी ही माहिती दिली. जिल्हा सहकारी बँकेचे १ लाख २ हजार ५६३ शेतकरी कर्जमुक्त झाले असून त्यांच्या खात्यावर ९७५ कोटी ९८ लाख ४८ हजार ६३१ कोटी रक्कम वर्ग झाली आहे. कर्जमुक्ती योजनेचा पहिला हप्ता ७ ऑगस्टला जाहीर झाला होता. त्यात जिल्हा बँकेचे ६६ हजार १३९ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता तर ६२७ कोटी ४७ लाख २६ हजार ५६२ रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली होती. आता दुसरा हप्ता आज, सोमवारी जाहीर करण्यात आला. त्यात ३६ हजार ४२४ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला व ३४८ कोटी ५१ लाखांची रक्कम वर्ग झाली आहे.

### कोचिंग क्लास आता १३ वर्षांआतील मुलांसाठी बंद

नाशिक (दै. संध्या) :

राज्यातील खासगी कोचिंग क्लासेससंदर्भातील विषय अनेक दिवसांपासून गाजत आहे. वेगवेगळ्या परीक्षांच्या पेपरफुटीमुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. आता कोचिंग क्लासेस कायद्याच्या नियमांमध्ये बंदिस्त करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरु केले आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून स्वतंत्र कायदा करण्याचे काम सुरू आहे. यासंदर्भात शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिक येथे महत्वपूर्ण माहिती दिली आहे. खासगी कोचिंग क्लासेस सध्या अनिर्बंधपणे फोफावत आहेत. विद्यार्थी शाळा, महाविद्यालयांमधील वर्गात कमी आणि कोचिंग क्लासेसमध्ये अधिक वेळ असतात.

# MPSC पेपरफुटीचा आरोपी निघाला 'उत्कृष्ट शिक्षक' पुरस्कार विजेता

### प्रेयसीच्या ब्रेकअपचा बदला अन् १२ लाखांचा सौदा उघड

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पद भरती परीक्षा पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक आणि चक्रावून टाकणारे खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि नंदुरबार येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक अमृत पाटील यांना यापूर्वी राज्यस्तरीय 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. आपल्या मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांशी तब्बल 12 लाख रुपयांत पेपर खरेदीचा सौदा केला होता, ज्यातील 5 लाख रुपये त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, 22 मार्च रोजी पार पडलेल्या या परीक्षेला बसलेल्या 40 हजार प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर या पेपरफुटीमुळे पाणी फेरलं आहे. ही पेपरफुटी एका वादग्रस्त 'लव्ह स्टोरी' आणि 'ब्रेकअप'मुळे समोर आली. या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणामागे एक नाट्यमय लव्ह-हेट स्टोरी समोर आली आहे. अमृत पाटील यांनी कौटिल्य अकादमीच्या प्रवीण पाटील या दलालाच्या मदतीने 22 मार्चच्या परीक्षेच्या दोन दिवस आधी मुलगी ऋतुजा पाटील हिच्यासाठी प्रश्नपत्रिका मिळवली. ऋतुजाने प्रेमापोटी हा फुटलेला पेपर तिचा बॉयफ्रेंड आणि MPSC चाच अभ्यास करणारा विद्यार्थी गौरव पाटील उर्फ लोकेश याला दिला. मात्र निकाल जाहीर झाल्यावर ऋतुजा पाटील उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली, मात्र तिचा प्रियकर गौरव पाटील अपात्र ठरला. ऋतुजा आता अधिकारी होईल आणि आपल्यापासून दूर निघून जाईल या भीतीपोटी, तसेच लग्नाला नकार दिल्याच्या रागातून गौरवने थेट एमपीएससीकडे पेपरफुटीची तक्रार केली.




# गणेशोत्सवात महाप्रसादासाठी नवा नियम?

■ मुंबई (दै. संध्या)

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांच्या विभागानं केलेल्या कामाची माहिती दिली. यावेळी राज्यात 3100 आस्थापनांची तपासणी करण्यात आल्याचं मुंढे यांनी म्हटलं.याच पत्रकार परिषदेत तुकाराम मुंढे यांना गणेशोत्सवात गणेश मंडळातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या महाप्रसाद आणि भंडाऱ्याच्या आयोजनासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. यावर मुंढे यांनी एफडीएची भूमिका स्पष्ट केली आहे. तुकाराम मंढे यांना गणेशोत्सवामध्ये गणेश मंडळातर्फे महाप्रसाद आणि भंडाऱ्याचे आयोजन केले जाते तर त्याकडे तुमचे लक्ष असेल का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले कीआपण सर्वांनी एक समजून घेतलं पाहिजे की , हे काही महाप्रसाद, भंडारा किंवा सण-उत्सव, ईद, गणेशोत्सव याबाबत नाही. इट इज अबाऊट रेग्युलेशन्स. हे नियमानुसार होतंय का याबाबत आहे, असं तुकाराम मुंढे म्हणाले.

रेग्युलेशन्समध्ये फूड बिझनेसेसमध्ये प्रत्येकाने रजिस्टर्ड लायसन्स करणे अपेक्षित आहे. जे स्टँडर्ड रेग्युलेशन जे आधीपासूनचे आहेत ते पाळावे, यामध्ये नवं असं काहीच नाही. त्यामुळे जिथे जिथे विनापरवाना, विना स्टँडर्ड, विदाऊट प्रोटोकॉल असेल, तर ते नियमभंग करत आहेत. मग ते फेस्टिव्ह सीजन असो वा नसो, ते महत्त्वाचं नाही. प्रत्येक फूड बिझनेस ऑपरेटरने लायसन्स घेतलं पाहिजे, रजिस्टर्ड पाहिजे, स्टँडर्ड रेग्युलेशनने ते पुरवलं पाहिजे ही रुटीन प्रोसेस आहे, फेस्टिव्ह सीजन म्हणून नाही, असं तुकाराम मुंढे म्हणाले.

अन्न व औषध प्रशासनाकडून 31 जुलैपर्यंत अन्न क्षेत्रातील 3 हजार 100 हून अधिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान 165 आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले. 750 हून अधिक आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली आहे. निलंबित परवान्यांपैकी सुमारे 105 जणांनी FDA आयुक्तांकडे अपील केलं, अपील केलेल्या प्रकरणांपैकी सुमारे 70 आस्थापनांना दिलासा देण्यात आला आहे,उर्वरित प्रकरणांमध्ये अंतिम आदेशाची प्रक्रिया सुरू असल्याचं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं.

नियमांचं पालन केल्यानंतर अधिकाऱ्यांकडून पुन्हा तपासणी आणि पडताळणी करण्यात येईल. सुधारणा समाधानकारक आढळल्यास निलंबन मागे घेण्याचा निर्णय घेतला जाईल. नियमांचं पालन न झाल्यास निलंबन कायम ठेवून पुढील कारवाई केली जाईल. सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असेल तरच परवाना तात्काळ निलंबित अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

कारवाईनंतर अनेक रेस्टॉरंट्सकडून स्वतःहून सुधारणा आणि किचनचं नूतनीकरण केलं जातंय. काही रेस्टॉरंट्सनी ठराविक कालावधीनंतर स्वतःहून किचन बंद ठेवून स्वच्छता आणि सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. विविध शहरं आणि ग्रामीण भागातून खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेत बदल झाला आहे. तेल, खाद्यपदार्थांचे रंग आणि दुधाच्या चवीत बदल झाल्याचं नागरिकांचं म्हणणं आहे. नागरिकांच्या प्रतिक्रियांसाठी भविष्यात औपचारिक फीडबॅक यंत्रणा उभारण्याचा FDAचा विचार आहे.'व्यावसायिकांनी नियमांचं पालन केलं तर नियामकाची गरजच उरणार नाही' असं तुकाराम मुंढेंनी म्हटलं.



# 'डिजिटल अरेस्ट' सारखा प्रकार नाहीच

### *सायबर फसवणूक झाल्यास तातडीने 'येथे' संपर्क साधा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आवाहन*

■ मुंबई (दै. संध्या)

सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर फसवणूक झाल्यास तातडीने '१९३०' या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'डिजिटल अरेस्ट' या सायबर जनजागृती लघुपटाचे आणि '१९३० महाराष्ट्र सायबर अँथम'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.


यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र , मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे , अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर) संजय शिंत्रे, महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव उपस्थित होते.

यावेळी लघुपट व १९३० महाराष्ट्र सायबर अँथम मध्ये योगदान देणारे कलाकार आशिष विध्यार्थी, पंकज त्रिपाठी, शरद केळकर, सोनाली बेंद्रे, जावेद जाफरी, गायिका सुनिधी चौहान, मंगेश देसाई, समय रैना आदी कलाकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीनंतरचा 'गोल्डन अवर' अत्यंत महत्त्वाचा असून, या काळात तक्रार नोंदविल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याची किंवा परत मिळविण्याची शक्यता अधिक असते. मात्र नागरिकांकडून तक्रार नोंदविण्यास तीन ते पंधरा दिवसांचा विलंब झाल्यास पैसे अनेक खात्यांमधून वळविले जातात आणि त्यांची रिकव्हरी अत्यंत कठीण होते. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विलंब न करता १९३० वर संपर्क साधणे आवश्यक आहे.

मोबाईल, ऑनलाइन व्यवहार, विविध पेमेंट गेटवे आणि डिजिटल माध्यमे ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. तंत्रज्ञानामुळे जीवन सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर नागरिक सायबर गुन्ह्यांना बळी पडण्याची शक्यताही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांचा मुकाबला करण्यासाठी पोलिस यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासोबतच नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक असल्याचे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

सायबर गुन्हेगारांकडून पार्सलमध्ये ड्रग्ज सापडल्याचे सांगणे, ओटीपी फ्रॉड, बनावट फोन कॉल, पोलीस अथवा सीबीआयच्या नावाने धमकावणे अशा विविध क्लृप्त्यांचा वापर केला जातो. स्क्रीनवर खाकी वर्दीतील व्यक्ती, पोलीस अधिकारी किंवा न्यायाधीशांचे रूप पाहून सामान्य नागरिक घाबरून जातो आणि त्यातून फसवणुकीला बळी पडतो. त्यामुळे अशा कोणत्याही दबावाला किंवा भीतीला बळी न पडण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय असून कलाकार, अभिनेते आणि गायकांच्या माध्यमातून हा संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. 'डिजिटल अरेस्ट' या ४२ मिनिटांच्या जनजागृती चित्रपटासह विविध क्लिप्स आणि रील्सच्या माध्यमातून सोशल मीडियावर व्यापक अभियान राबवून हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

# दिवाळीत ग्राहकांना कांदा रडविणार?

■ मुंबई (दै. संध्या)

देशात गतवर्षी सुमारे ३०७ लाख टन कांदा उत्पादन होऊनही उन्हाळी कांदा खराब होण्याचे प्रमाण ३० टक्क्यांवर गेल्यामुळे आणि मोसमी पावसाने ओढ दिल्याने कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. त्यातच ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बाजारात येणाऱ्या आंध्र प्रदेश, कर्नाटकातील कांद्याची आवक अद्याप सुरू न झाल्याने नोव्हेंबरच्या सुरुवातीस खरीप कांद्याची आवक सुरू होईपर्यंत कांदा दरात तेजी राहील. थोडक्यात यंदा दिवाळीत कांदा ग्राहकांना चांगलाच रडविणार आहे. गतवर्षी देशात सरासरी ३०७ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. एकूण कांदा उत्पादनात रब्बी, उन्हाळी कांद्याचे प्रमाण ७५ टक्के, पूर्व हंगामी खरीप हंगामातील १० ते १२ टक्के आणि उशिराच्या खरिपातील कांद्याचा १० ते १२ टक्के हिस्सा असतो. उन्हाळी कांद्याचा दर्जा चांगला असल्यामुळे साठवणूक केली जाते. यंदा उन्हाळी कांदा काढणीच्या वेळी अतिवृष्टी, अवकाळी, गारपिटीचा फटका बसल्यामुळे पावसात भिजला. त्यामुळे चाळींमध्ये साठवलेल्या कांद्याच्या वजनात घट येण्यासह कांदा सडणे, कोंब येण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी साठवलेल्या कांद्यापैकी ३० ते ३५ टक्के कांद्याचे नुकसान झाले आहे. दक्षिणेकडील आंध्र प्रदेश, कर्नाटकातील कांदा ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बाजारात येतो. महाराष्ट्रातील कांदा अखेरच्या टप्प्यात असताना दक्षिणेकडील कांदा सुमारे दोन महिने देशाची गरज भागवितो. यंदा मोसमी पाऊस उशिराने सक्रीय झाला, शिवाय पर्जन्यवृष्टीत घट झाली आहे.

# संपादकीय

## पिढ्या न् पिढ्या

कॉलेजमध्ये तास बुडवून कट्ट्यावर गप्पा मारणं किंवा कँटीनमध्ये चकाट्या पिटणं हे काही नवं नाही; पिढ्या न् पिढ्या ते होत आलं आहे. तरीही पूर्वी वर्ग अगदीच रिकामे नसत. काही विशिष्ट शिक्षकांच्या तासांना तर शंभर टक्के उपस्थिती असे; कॉलेजमध्ये महत्त्वाचा असा कोणता 'इव्हेंट' नसेल, कोणतीही एकांकिका वा अन्य स्पर्धा नसेल, तर वर्ग बऱ्यापैकी भरत. मात्र, अलीकडे बहुतेक वर्ग रिकामे राहतात, असा अनुभव आहे. 'मुलं तासांना बसण्याचं प्रमाण कमी झालंय,' ही महाविद्यालयीन शिक्षकांची तक्रार सार्वत्रिक झाली आहे. असं का झालं असावं? विद्यार्थी तासांना बसत नसल्याचं चित्र भारतातच नव्हे, तर ब्रिटन, अमेरिका यांसह अनेक देशांत दिसतं. यामागील कारणांचाही शोध अनेक विद्यापीठांनी तज्ज्ञ समितींद्वारे घेतला. गेल्या काही वर्षांत अशा प्रकारचे शंभरहून अधिक अभ्यास झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान आणि यू-ट्यूबसारखे समाज माध्यम यांमुळे कोणतीही माहिती सहज आणि सुलभपणे मिळत असल्यानं विद्यार्थ्यांना वर्गातील अध्यापनात रस उरला नसल्याचं निरीक्षण या अभ्यासांनी नोंदवलं आहे. शिक्षकांची अध्यापनाची पद्धत पारंपरिक आणि कंटाळवाणी असेल, तर विद्यार्थी त्यांच्या तासांना जात नाहीत, याचाही उल्लेख त्यांत आहे. विद्यार्थ्यांना खिळवून ठेवण्यात शिक्षक कमी पडत असल्याचा मुद्दाही आहे. शिवाय विद्यार्थ्यांतील बेफिकिरी, पार्ट-टाइम जॉब, खासगी क्लास, अन्य अभ्यासेतर उपक्रम, विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं गैरसोयीचे असलेले वेळापत्रक आदी कारणांचाही उल्लेख आहे. मात्र, खरा मुद्दा आहे, तो माहिती आणि ज्ञान यांबाबत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात कमी होत असलेल्या अंतराचा. शिक्षकांनी ज्ञान आणि माहितीसंपन्न असणं; तसेच अध्यापनकुशल असणं ही खरं तर प्राथमिक अट. पाठ्यपुस्तकांतील संकल्पना समजून घेण्यासाठी, अधिक माहितीसाठी विद्यार्थी शिक्षकांपेक्षा 'एआय' किंवा 'यू-ट्यूब'वरील व्हिडिओंना प्राधान्य देतात, असं चित्र आहे. शहरी भागात ते ठळक असून, निमशहरी, ग्रामीण भागांतही ते दिसतंय. थोडक्यात, माहितीचा स्फोट होत असतानाच्या या काळानं शिक्षक आणि विद्यार्थी यांना एकाच प्रतलावर आणलं आहे.

मात्र, माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. माहितीचा उपयोग करून ज्ञान मिळवणं महत्त्वाचं असतं; आणि नेमकी हीच गोष्ट कॉलेजांतील वर्गांत होणं अपेक्षित असतं. शिक्षकांनी पुस्तक वाचून त्यातील मुद्दा समजून सांगणं किंवा विद्यार्थ्यांना नोट्स देणं ही पारंपरिक पद्धत आता उपयोगी नाही. आज अनेक शाळा आणि कॉलेजांतील वर्ग 'डिजिटल' झाले आहेत; तेथील फळ्याची जागा 'डिजिटल बोर्ड'नं घेतलीय हे खरं आहे; परंतु 'डिजिटल वर्गां'मधील शिक्षण अजूनही पारंपरिकच आहे. 'एआय' किंवा इंटरनेट यांवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या पलीकडं जाण्यासाठी या वर्गांचं रूपांतर चर्चा आणि कृतिकेंद्रांत व्हायला हवं. त्यासाठी शिक्षकांनी केवळ माहितीचे स्रोत होऊन चालणार नाही, तर त्यांना विद्यार्थ्यांचे खऱ्या अर्थानं मार्गदर्शक व्हावं लागेल. पुस्तकांमधील संकल्पना विविध व्यावहारिक उदाहरणांद्वारे स्पष्ट करणं, त्यांना प्रकल्प सुचवणं, प्रश्नांच्या मुळाशी जाऊन तर्कसंगत विचार करायला लावणं आवश्यक आहे. आणि मुख्य म्हणजे विषयज्ञान आणि माहिती यांबाबत शिक्षकांना अद्ययावत राहण्याशिवाय, विद्यार्थ्यांच्या पुढे राहण्याशिवाय पर्याय नाही.

नेमकं हेच होताना दिसत नाही. आपल्या अनेक शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान हाताळता येत नसल्याची किंवा ते 'एआय'चा परिणामकारक वापर करीत नसल्याची तक्रार विद्यार्थी करतात. शिक्षक आपल्याहून अधिक माहितीसंपन्न नसतील, तर विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल आदर कसा निर्माण होणार? त्यामुळे माहितीचा पुरवठा करण्यापेक्षा शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील वाटाड्या होण्याची गरज आहे. त्याच्या पूर्ततेच्या दिशेने प्रयत्न झाल्यास शिक्षक आणि वर्ग हे दोघेही कालबाह्य ठरणार नाहीत. हाच ओस पडत असलेल्या वर्गांतून घ्यावयाचा धडा आहे.

## संस्कृत सुभाषित

अशनाया वै पाप्यमति:

अर्थ : भुकेमुळेच माणसाच्या मनात पाप बुद्धी निर्माण होते.

## गुरु वचन

### गुण हीच महानता असते

एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्वतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले.

स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने महान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

## उपदेशकथा

### अहिंसा

नारदमुनी म्हणजे तिन्ही लोकांत भटकंती करणारे. ते एकदा पृथ्वीवरून फिरत होते. रस्त्याने चालले असता, त्यांच्या वाटेत एक अस्सल नाग आडवा आला. त्यांचे लक्ष नव्हते. पण तो नाग फुत्कारणार इतक्यात त्यांना नागाची जाणीव झाली. नारद त्याला म्हणाले, 'वेड्या, हे काय करतोस? पापाचे घडे का भरतोस? गतजन्मीच्या तुझ्या पापांमुळे तुला सर्पयोनीत जन्म लाभला आणि आताही असे लोकांचे जीव घेत सुटलास तर पुढचा जन्म कोणता लाभेल? जरा विचार कर.' नाग म्हणाला, 'नारद महाराज, मी काय करू तेवढे सांगा.' नारद म्हणाले, 'जास्त विचार करू नकोस. फक्त आजपासून कोणालाही दंश करू नकोस म्हणजे झालं.' त्या नागाने त्यांचा सल्ला मानला. काही वर्षांने नारद त्याच रस्त्याने चालले असता, तोच नाग त्यांना दुबळा, विकलांग झालेला दिसला. त्याचे सारे शरीर लोळागोळा झाले होते. हे सारे कशामुळे घडले? या नारदांच्या प्रश्नावर तो म्हणाला, 'याला कारण तुम्ही. तुमच्या उपदेशांमुळे मी दंश करणे सोडले, तर मुलाबाळांनी मला ओढून, दगड मारून असे छळले.' नारद म्हणाले, 'वेड्या, मी तुला दंश करू नकोस असे म्हटले होते, फुत्कारूही नकोस असे म्हटले नव्हते.'

कथा उपदेश : हिंसा म्हणजे तेजास्विता हे जसं चूक तसंच अहिंसा म्हणजे तेजोहिनता हेही चूकच.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शोभन ०७:५४:४७ |
| २७ ऑगस्ट २०२६ | करण:वणिज ०९:०९:०५ |
| गुरुवार | करण:विष्टि २१:३२:३१ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:सिंह |
| श्रावण शके | चन्द्र:कुम्भ१३:३५:११ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – रबिलावल |
| अयन– दक्षिणयन | तारीख – १३ |
| मास– श्रावण | विशेष |
| ऋतु– सौर शरद | नारळी पौर्णिमा |
| शुक्ल पक्ष | शुक्ल यजु: श्रावणी |
| तिथि:चतुर्दशी ०९:०९:०५ | बृहस्पती पूजन |
| नक्षत्र:धनिष्ठा | पौर्णिमा प्रारंभ |
| २६:१५:१२+ | सकाळी ९.०८ |

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 8 | 1 | 5 | | | | 6 |
| | 5 | | | 9 | | 4 | 2 | 8 |
| 3 | | 9 | | | 2 | | 5 | |
| | 3 | 5 | | | | 6 | | |
| 4 | | | | | | | | 3 |
| | | 6 | | | | 8 | 7 | |
| | 1 | | 9 | | | 3 | | 2 |
| 8 | 9 | 2 | | 3 | | | 1 | |
| 6 | | | | 2 | 1 | 5 | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०५० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 5 | 1 | 4 | 6 | 3 | 9 | 2 |
| 3 | 2 | 4 | 8 | 9 | 7 | 6 | 5 | 1 |
| 9 | 1 | 6 | 5 | 2 | 3 | 4 | 7 | 8 |
| 6 | 5 | 7 | 2 | 3 | 9 | 8 | 1 | 4 |
| 4 | 9 | 8 | 6 | 7 | 1 | 2 | 3 | 5 |
| 2 | 3 | 1 | 4 | 5 | 8 | 7 | 6 | 9 |
| 1 | 7 | 3 | 9 | 8 | 2 | 5 | 4 | 6 |
| 5 | 6 | 2 | 3 | 1 | 4 | 9 | 8 | 7 |
| 8 | 4 | 9 | 7 | 6 | 5 | 1 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१८ – डॉ. जोसफ एल. जॉन्सन यांना लिबिरियाचा मंत्री बनविण्यात आले.
- १९३८ – न्यूयॉर्क सबवे अपघातात १६ ठार.
- १९४५ – जपानी लोकांचा आत्मसर्मपणानंतर अमिरेकी लष्करी तुकडी जपानमध्ये शिरले.
- १९९० – इराकमधून ५२ अमिरेकी तुर्कीमध्ये आले.
- २००६ – बलूचिस्तान या पाकिस्तानच्या अशांत भागात सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत नवाब अकबर खान बुगती या बंडखोरांच्या प्रमुखासह ३७ बंडखोर आणि २१ सुरक्षा रक्षक ठार झाले.
- २००६ – नेपाळमध्ये जमीन खचून एकाच कुटुंबातील १० जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००७ – ठाण्याची बॅडमिंटनपटू प्राजक्ता सावंत हिने आशियाई किशोर (१६ वर्षा खालील) बॅडमिंटन स्पर्धेत मिश्र दुहेरीचे विजेतेपद जिंकले.

### जन्म

- १८५९ – दोराबजी जमशेटजी टाटा, उद्योगपती.
- १९०८ – सर डॉन ब्रॅडमन, क्रिकेटमधील विक्रमवीर.
- १९१० – सेतुमाधवराव पगडी, प्रसिद्ध इतिहाससंशोधक.

### निधन

- १९८१ – जोन एड्वर्डस, गायक.
- १९८४ – बीली सँड्स, अभिनेता.
- १९१५ – कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, जर्मनीतील प्रसिद्ध नाटककार व 'नवा काळ' चे संस्थापक.
- २००६ – हृषिकेश मुखर्जी, प्रसिद्ध दिग्दर्शक.

## : SMS :

Pappu: Shaadi ke liye garden book kiya?
Gappu: Haan, Salim Ali!
Pappu: Wahan to machhar bahut hain!
Gappu: Koi tension nahi, Beed wale sab khoon pee lenge, machhar bhooke mar jayenge!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२ | २३.५ |
| अहमदनगर | ३१.७ | २२.४ |
| अकोला | ३३.१ | २६ |
| अमरावती | ३२.७ | २५.७ |
| बीड | ३६.८ | २७.४ |
| भंडारा | ३२.३ | २५.९ |
| बुलढाणा | ३८.७ | २६.८ |
| चंद्रपूर | ३६.३ | २७.२ |
| चेन्नई | ४२.३ | २७.७ |
| नवी दिल्ली | ३८.९ | ३२.९ |
| धुळे | ३५.४ | २५.४ |
| गोंदिया | ३२.५ | २५.७ |
| जळगाव | ३४.३ | २५.४ |
| कोल्हापूर | ३०.१ | २२.९ |
| लातूर | ३१.७ | २३.५ |
| मुंबई | ३४.५ | २९.८ |
| नागपूर | ३१.८ | २६.४ |
| नांदेड | ३४.२ | २५.१ |
| नंदूरबार | ३२.१ | २४.४ |
| नाशिक | ३०.४ | २३.३ |
| पुणे | २६.९ | २२ |
| पंढरपूर | ३४.३ | २३.७ |
| सातारा | ३१.३ | २२.६ |
| सांगली | ३२.८ | २३.२ |
| सोलापूर | ३३.८ | २४.३ |
| वर्धा | ३५.३ | २६.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.

**मिथून :** मिथुन शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही.

**सिंह :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा. सार्वजनिक स्थितीची आपल्याला चिंता राहील.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा: पूर्व आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व निर्णय घेताना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दु:खी राहील. निष्कारण शंकेमुळे बेचैन रहाल.


**धनू :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व पद, प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्या. कोणत्यातरी रहस्याचा उलगडा होईल.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे. दुसऱ्यांची मदत फायदेशीर होईल.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी : शुभ दिशा: पश्चिम आजचा दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. आळस दूर करा.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५१



### आडवे शब्द

१. निर्गुण परमेश्वराचे आणखी एक विशेषण
४. कट्टर
६. शक्ती, बळ
१०. नरक, पाताळ
१२. पटाईत
१३. अप्रूप
१४. टक्कर
१६. पाप करण्यास भिणारा
१८. ध्वनी
१९. धमनी, नाडी
२०. कोल्हापूरची देवी
२२. छोटी वस्ती
२३. इंद्रिय
२४. शपथ
२५. चलनवलन
२६. वजनदार, भारी
२७. कुऱ्हाडीला धार लावण्याचा दगड
२९. पळून गेलेला
३०. घेराव, वेढा
३२. टक, दृष्टी
३५. पौराणिक अश्ववाहन
३७. गोव्यातील एक दैवत
३९. राजाचा कालावधी
४१. महानदी
४२. मुलगा
४३. वृत्तवाहिन्यांच्या आक्रमणातही टिकून असलेले
४५. राजाचे संबोधन
४७. कोरडा
४९. बाजार
५०. एकरूपता
५१. अफूचे बी
५२. मोठा गाडा
५४. घाण
५५. घोड्यावरून मारलेली चक्कर
५७. प्रमाणपत्र
५८. निमंत्रण, आवाहन
६०. गाय
६१. बरे–वाईट (दिसणे)
६२. शस्त्राचा घाव
६३. शिंपल्यातील प्राणी
६६. बाण
६७. पातळ खांब
६८. फायदा
६९. प्राणीमात्रांवरील प्रेम
७१. अभिनय
७३. सरपटत नेल्याची खूण
७४. गवताचे रूंद पान
७५. घालमेल
७६. उत्तराधिकारी

### उभे शब्द

१. धिक्कार
२. करणारा
३. पृथ्वी
४. केसांचा खोटा रंग
५. गाईचे पिल्लू
६. शिर्डीचे संत
७. अभिप्राय
८. शिकारीचा प्राण
९. मातापिता
११. शोध, माग
१३. जुनाच्या विरुद्ध
१५. बेडूकगाणी
१७. भयंकर
१८. जननी
१९. आश्चर्य
२०. गाण्याचे कडवे
२१. गोणपाट
२२. फुशारक्या मारणारा
२३. महासर्प
२४. रुपायाचा सोळावा भाग
२८. छायाछत्र असलेला
२९. पराभव
३१. फोडलेले द्विदल धान्य
३३. लोकांचे मत
३४. दात
३६. चेष्टा
३८. निराश
३९. अरण्य
४०. पृष्ठभागावरील छोटा तुकडा
४२. वेदनेने विव्हळणे
४४. मागील अंगण
४५. श्रीयुत
४६. सोने
४७. लाकूडकाम करणारा
४८. कमळाचे तळे
५०. युद्ध
५१. प्रयत्न
५३. पत्र
५६. पंचामृतातील फळ
५९. त्याच त्या गोष्टींची कटकट करणारा
६२. दिलेला शब्द
६३. बांगडीवाला
६४. पूर्वी कधीही न घडलेले
६५. सहाय्य
६६. देह
६७. गंध
७०. यज्ञ
७१. अनुस्वारी उच्चार केल्यास 'सौं'ना मारलेली हाक
७२. लबाडीचा हेतू

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५० चे उत्तर

आडवे उत्तर १.शिकागो ४.नमनाला घडाभर तेल १३.लंगर १४.मदन १५.रोकड १६.जलाशय १७.गदगदणे १९.कडबा २१.भुंगा २३.रीम २५.नाजायज २७.मास २८.आंबट २९.वासरु ३१.रामायण ३२.साद ३३.कलत्र ३५.मानव ३६.देव ३८.कणकण ४०.हरीण ४१.प्रेशर ४२.काबाडकष्ट ४३.दरदाम ४६.नीरव ४८.वरदान ४९.कार ५०.बल ५१.जान ५३.बकध्यान ५५.पैठणी ५६.सेकंद ५७.भकास ५९.पै ६०.कलप ६१.राठ ६५.साम ६६.दमा ६८.भित्यापाठी ब्रह्मराक्षस ७२.रन ७३.साधक ७४.म्हण ७५.हरकत ७८.बाबा ८०.वचा ८१.व ८२.वासर ८३.वाह ८४.जवळीक ८५.धुरीण ८६.मोसम ८७.आनन

उभे उत्तर : १.शिलंगण २.कागद ३.गोरगीब ४.नमणे ५.मद ६.नानक ७.घरोबा ८.डाक ९.भडभुंजा १०.तेज ११.ललाट १२.कायरस १८.दमट २०.डमरु २२.गायरान २४.सवालजबाब २५.नाद २६.जमाव २७.माणदेश २८.आंदण ३०.सत्र ३२.साकव ३४.अरीष्ट ३७.वरकरणी ३९.कसर ४०.हकनाक ४१.प्रेम ४३.दर ४४.रदाळ ४५.दान ४६.नीलकंठ ४७.वजा ४८.वन ४९.काठपदर ५०.बसेरा ५२.नभ ५३.बस ५४.ध्यास ५५.पैल ५८.कामाठी ६०.कमलाकर ६२.भुत्या ६३.ता!ण ६४.साक्ष ६७.मनमोहन ६८.भिकबळी ६९.पान ७०.ब्रह्मचारी ७१.सहवास ७३.सावज ७६.रसम ७७.लोचन ७९.बाक ८०.वधू ८३.वान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. सौरभ मुथा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**बारामती : दैनिक संध्या**

विष्णूपंत चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने बारामतीतील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ.सौरभ मुथा यांचा वाढदिवस फार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कसलीही अपेक्षा न ठेवता हा वाढदिवस फक्त सामाजिक जाणीव म्हणून विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने साजरा केला.अशा सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा केल्यामुळे डॉ.मुथा यांचे कुटुंबीय भावनिक होऊन असे प्रेम करणारे फार थोडे लोक आहेत असे ते म्हणाले. वाढदिवसानिमित्त हॉस्पिटलध्ये केक कापून डॉ.सौरभ मुथा सरांना शुभेच्छा देण्यात आल्या.दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रेरणादायी छायाचित्रासह हॉस्पिटलधील महिला कर्मचाऱ्यांना कुकर व पुरुष कर्मचाऱ्यांना जर्किंग व इतर भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपकारदाता,दिव्यपुरुष ॲड.सुधीरजी पाटसकर, अन्नदाता,सभापती सत्यव्रत अर्जुनराव काळे,पत्रकार तैनुरभाई शेख,अध्यक्ष चिऊशेठ जंजिरे,अमित बगाडे,सुप्रसिद्ध फोटोग्राफर प्रशांत मामा कुचेकर,पवनराजे बनसोडे,गरुड कमांडो नेताजी बुरुंगले (फौजी),नरेंद्र भाऊ मिसाळ,मेंबर विठ्ठल शेठ आगवणे,ओंकार शेठ राऊत,चेतन शेठ वाडेकर,विनोद भैय्या हिंगमिरे व विष्णुपंत चव्हाण यांच्यासह मित्रमंडळाचे सदस्य उपस्थित होते.सामाजिक जाणीवेतून आपुलकीने असा उपक्रम राबवून मित्र मंडळाने डॉ.सौरभ मुथा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा केल्याबद्दल मुथा कुटुंबीयांनी सर्वांचे आभार मानले.

### बारामतीत दिव्यांगांसाठी 'ऑन दि स्पॉट' शिबिराचे आयोजन

**बारामती : दैनिक संध्या**

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या वेळापत्रकानुसार बारामती तालुक्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स वितरणाचे 'ऑन दि स्पॉट' शिबिर सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती, बारामती येथे आयोजित करण्यात आले आहे. एस.आर. ट्रस्ट, मध्यप्रदेश व ॲलिम्को (ALIMCO), मध्यप्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामध्ये अधिकृत फॅब्रिकेटिंग एजन्सीचे तज्ज्ञ उपस्थित राहून पात्र लाभार्थ्यांचे प्रत्यक्ष मोजमाप घेणार आहेत. तसेच आवश्यकतेनुसार कृत्रिम हातपाय, कॅलिपर्स व इतर सहाय्यभूत साधनांचे तात्काळ वितरण करण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभ केवळ पात्र अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींनाच मोफत मिळणार आहे. बारामती तालुक्यातील सर्व पात्र अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींनी यूडीआयडी प्रमाणपत्रासह उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंचायत समितीचे सभापती व गटविकास अधिकारी किशोर माने यांनी केले आहे.

### '१ बेस १ टॉप' नियमाची कडक अंमलबजावणी

**पुणे : दैनिक संध्या**

शहरात कर्णकर्कश आवाजाविरोधात पुणे पोलिसांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली आहे. मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त मिरवणूक काढणाऱ्या विविध मंडळांची भेट घेऊन पोलीस निरीक्षकांनी त्यांना आवाजाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आणि अनधिकृत डीजे सिस्टीम लावण्यापासून परावृत्त केले. या मोहिमेअंतर्गत फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (वपोनी) संदिप देशमाने यांनी कसबा पेठेतील कागदीपुरा येथे एका मंडळाने लावलेले अतिरिक्त स्पीकर्स स्वतः उपस्थित राहून कमी करायला लावले आणि ही कारवाई अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतलेल्या '१ बेस १ TOP' च्या नियमाची आणि निर्णयाची प्रत्यक्ष जमिनीवर कडक अंमलबजावणी होताना दिसत आहे. पोलिसांच्या या तत्परतेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### सशस्त्र दलातील कर्मचाऱ्यांसाठी आता कॅन्टीनमधून एथरची इलेक्ट्रिक स्कूटर्स

**पुणे : दैनिक संध्या**

भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जीला कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंट (CSD) पोर्टलवर आपल्या इलेक्ट्रिक स्कूटर्सची विक्री करण्यास मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे पात्र सशस्त्र दलातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आता CSD पोर्टलच्या माध्यमातून एथरच्या इलेक्ट्रिक स्कूटर्स खरेदी करता येणार आहेत. CSD पोर्टलवरील एथर स्कूटर्सची विक्री सप्टेंबर २०२६पासून सुरू होण्याची अपेक्षा आहे. एथरच्या 450 आणि Rizta या मॉडेल रेंजमधील एकूण आठ व्हेरिएंट्स CSD प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात आले आहेत. यामध्ये Ather 450 Apexचा समावेश नाही.

# यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

## खड्डे बुजविणे, वाहतूक कोंडी, पार्किंग, कचरा व्यवस्थापन व अतिक्रमणांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देश

■ पुणे (दै. संध्या)

चाकण परिसरातील विविध समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा आणि संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. चाकणच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने कामाचा रोडमॅप तयार केला असून, समितीला आवश्यक त्या सूचना व मागण्या ऐकून घेऊन काम करण्यास पूर्ण सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज केले. शासकीय विश्रामगृह येथे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी चाकण परिसरातील विविध प्रश्न तसेच



चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी गठित उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे,उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, चाकणच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा एकाच व्यासपीठावर आल्या असून, ही सकारात्मक बाब आहे. समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

चाकण परिसरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहतुकीचे वाढते प्रमाण लक्षात घेता सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी तातडीने १०० सुरक्षा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, आवश्यकतेनुसार नवीन पोलिस ठाणी उभारण्याबाबतही कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण हे मोठे औद्योगिक केंद्र असून देश-विदेशातून अनेक नागरिक व उद्योजक येथे येतात. त्यामुळे परिसराची स्वच्छता, सुरक्षितता आणि पायाभूत सुविधा दर्जेदार असणे आवश्यक आहे. चाकणमध्ये येताना रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा व प्लास्टिक दिसणे ही चिंतेची बाब आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी चर्चा करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले. कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर एमआयडीसीशी चर्चा झाली असून कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. प्रकल्प उभारणीचे काम पुढे नेण्यात येत आहे.

कोणत्याही प्रकल्पाला काही कालावधी लागतो; मात्र कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

## ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त वृक्षारोपण



■ पुणे (दै. संध्या)

हजरत महंमद पैगंबर साहेब यांच्या जयंतीनिमित्त (ईद - ए - मिलादुन्नबी) पुण्यनगरीचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या आयोजनातून बोपोडी येथील राजर्षी शाहू महाराज पक्षी विहार केंद्रात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पिंपळ वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी बोलताना परशुराम वाडेकर म्हणाले, "पिंपळ हा राष्ट्रीय वृक्ष असून पवित्र ग्रंथ आणि पुराणांमध्येही त्याचे महत्त्व वर्णन करण्यात आले आहे. हजरत महंमद पैगंबर साहेबांनी जगाला शांतता, सद्भावना, बंधुत्व आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे." सामाजिक कार्यकर्ते जुबेर पीरजादे म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या आणि भारतीय संविधानाच्या विचारांवर चालत महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आगळावेगळा पर्यावरणवादी उपक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशात अशा प्रकारचा उपक्रम प्रेरणादायी आहे." कार्यक्रमात महिला पदाधिकाऱ्यांच्या हस्तेही पिंपळ वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी मानाजी बाग सार्वजनिक मंडळाचे अध्यक्ष गोविंद निंबाळकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत नाईकरे, सागर काळे, शुभम माकर, शुभम ताकवले यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अमानभाई, जुबेर पीरजादे, शहाबुद्दीन काजी आणि हैदर भाई सय्यद उपस्थित होते.

## 'जेन झी आणि अल्फा पिढी आमच्यापेक्षा अधिक जागरूक

शेतीच्या पाण्यासाठी कोणत्या योजना कोणी आणल्या, हे नव्या पिढीला समजणे गरजेचे' — आमदार दिलीप सोपल

■ बार्शी (दै. संध्या)

'आजची जेन झी आणि अल्फा पिढी आमच्यापेक्षा अधिक जागरूक आहे. बार्शी तालुक्यातील सिंचन योजनांची निर्मिती कशी झाली आणि त्यासाठी कोणी पुढाकार घेतला, याची वस्तुस्थिती नव्या पिढीला समजणे गरजेचे आहे,' असे सांगत आमदार दिलीप सोपल यांनी शेतीच्या पाण्यासाठी आपल्या ४१ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत केलेल्या कामांचा पत्रकार परिषदेत लेखाजोखा मांडला. १९८४-८५ मध्ये आमदार म्हणून निवडून आल्यानंतर तालुक्यात लघुप्रकल्प, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि सिमेंट बंधारे उभारण्याच्या कामाला सुरुवात केल्याचे सोपल यांनी सांगितले. पिंपळगाव-ढाळे प्रकल्पाचे १९८७ मध्ये भूमिपूजन झाले. आंदोलनामुळे काही वर्षे रखडलेला हा प्रकल्प २००४ मध्ये पूर्ण झाला. भूसंपादनाच्या मोबदल्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या माध्यमातून घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. हिंगणी प्रकल्पाची सुरुवात माजी आमदार दिवंगत आबासाहेब बुरगुटे यांनी करून तो पूर्ण केला.




जवळगाव प्रकल्पाची सुरुवात दिवंगत आमदार शहाजीराव पाटील यांनी केली आणि त्यांच्या तसेच आमदार चंद्रकांत नाना निंबाळकर यांच्या प्रयत्नांतून तो पूर्ण झाला, असे सोपल यांनी स्पष्ट केले. पाथरी आणि कोरेगाव हे ब्रिटिशकालीन तलाव असून, त्यांच्या पुनर्बांधणी व मजबुतीकरणासाठीही प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कळंबवाडी, बाभूळगाव आणि मांडेगाव येथील प्रकल्पांसह मुंगशी, सासुरे आणि दहिटणे येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांसाठी पाठपुरावा केल्याचे सोपल म्हणाले. संगमनेर, मालेगाव आणि सुर्डी येथील साठवण प्रकल्पही पूर्ण झाल्याचे त्यांनी नमूद केले. बार्शीच्या सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या उजनी बोगदा आणि बार्शी उपसा सिंचन योजनेला १९९४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या माध्यमातून मान्यता मिळाली. त्यानंतर १९९५ मध्ये महायुती सरकारच्या काळात या योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. वाढीव कामासाठी २०११ मध्ये दुसरी प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे सोपल यांनी सांगितले. २००९ ते २०१४ या कालावधीतील अखेरची दोन वर्षे मंत्रिपदावर असताना तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून योजनेसाठी निधी मिळवून दिला. त्यामुळे २०१४ च्या अखेरीस उपसा सिंचन योजनेचे पाणी पहिल्यांदा उपळाई ठोंगे आणि लक्ष्याचीवाडी परिसरापर्यंत पोहोचले. बार्शी शहरातील गणेश तलावातही पाणी सोडण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. 'कोणी काय केले किंवा केले नाही, यावर भाष्य करण्यापेक्षा आम्ही तालुक्यासाठी आजपर्यंत काय केले, याची माहिती जेन झी आणि अल्फा पिढीला मिळावी. त्याचबरोबर जुन्या पिढीच्या विस्मरणात गेलेल्या कामांनाही उजाळा मिळावा, या उद्देशाने हा लेखाजोखा मांडला आहे,' असे सोपल यांनी स्पष्ट केले.

## कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात



■ बारामती(दै. संध्या)

बारामती येथील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, शारदानगर मधील तृतीय वर्ष (सत्र ५ वे) विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमांतर्गत शैक्षणिक सहल दि.१८ ते २३ ऑगस्ट २०२६ दरम्यान हैदराबाद या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली होती. ती अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीमध्ये एकूण 85 विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये 31 मुली व 54 मुलांचा सहभाग होता. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना कृषी संशोधन,उच्च शिक्षण आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापनातील संधींचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

सहलीमध्ये जागतिक स्तरावरील अत्यंत महत्त्वाची कृषी संशोधन संस्था ICRISAT - आंतरराष्ट्रीय निम-शुष्क उष्णकटिबंधीय पीक संशोधन संस्था, आयसीएआर (ICAR) च्या 'आयआयएमआर' भारतीय तृणधान्य/मिलेट संशोधन संस्था,भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था NIPHM आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE) यामधील पदव्युत्तर कृषी व्यवसायाच्या दृष्टीने कृषी व्यवसाय व्यवस्थापन (PGDM - ABM) प्रा. जयशंकर तेलंगणा राज्य कृषी विद्यापीठ' अशा वरील नामांकित संस्थांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. याद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी संशोधन तंत्रज्ञान, कृषी विस्तार, PGDM-ABM/ MBA प्रवेश प्रक्रिया,प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि करिअरच्या विविध संधींविषयी सखोल मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच नेहरू प्राणीसंग्रहालय, गोवळकोंडा किल्ला, चौमहल्ला पॅलेस, रामोजी फिल्म सिटी, चारमिनार,बिर्ला मंदिर,एनटीआर गार्डन आणि लुंबिनी पार्क या ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना भेट देऊन आनंद घेतला.

संशोधन आणि व्यवसायाच्या दृष्टीने अशा विविध नामांकित संस्थांना विद्यार्थ्यांच्या भेटी व्हाव्यात या अनुषंगाने संस्थेचे चेअरमन मा.श्री.राजेंद्रदादा पवार यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळते. सहलीचे मुख्य समन्वयक म्हणून प्रा.राहुल बेलदार यांनी काम पाहिले,तर त्यांच्याबरोबर प्रा. गणेश शिंदे,डॉ.मयूर पिसाळ आणि प्रा.रेश्मा शिंदे यांनी सहकार्य करून सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या.संस्थेचे एच.आर. जाधव सर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.ही सहल विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी अत्यंत दिशादर्शक ठरेल, अशी भावना प्राचार्य भोईटे मॅडम यांनी व्यक्त केली.

## बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचे आजपासून आमरण उपोषण सुरु

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलनाचे हत्यार अधिक तीव्र केले असून आजपासून 'आमरण उपोषण' सुरू केले आहे. या आंदोलनात मुख्य उपोषणकर्ते म्हणून सुरेखा वासनिक किरण देवकरे हे आजपासून प्रत्यक्ष उपोषणाला बसले आहेत. शासनाने लागू केलेल्या २०२३ च्या जाचक आणि अन्यायकारक अटींच्या निषेधार्थ गेल्या काही दिवसांपासून हे आंदोलन सुरू आहे. शासनाच्या सर्वंकष समान धोरण निर्णय (GR) मुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. सामाजिक न्याय विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय टाळाटाळ केली जात असून, ५८ जातींमधील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या केवळ १०० वर आणून



सरकारने पीएचडी शिक्षणाचे केलेले 'रेशनिंग' अत्यंत निंदनीय आहे, अशी तीव्र भावना आंदोलक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.या आंदोलनाला रिपब्लिकन युथ फेडरेशन व आंबेडकरवादी चळवळीतील विविध संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनात बोलताना रिपब्लिकन पक्षाचे नेते राहुल डंबाळे यांनी राज्य सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. "सामाजिक न्याय विभागाकडे अतिरिक्त निधी उपलब्ध असतानाही, हजारो कोटी रुपये इतर विभागांना बेकायदेशीरपणे वळविले जात आहेत. मागील पाच वर्षांत तब्बल ९ हजार ८६२ कोटी रुपये 'लाडकी बहीण' आणि 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेकडे वळविण्यात आले आहेत.

# लोकमानस : मुलखावेगळी माणसं : छोट्या वयात सी ए बनण्याचा नंदिनीचा विक्रम

■ पुणे (दै. संध्या)

काही विद्यार्थी कमी वयात मोठं शैक्षणिक यश मिळवतात. अशा विद्यार्थ्यांविषयी आपण नेहमीच ऐकतो, वाचतो. नंदिनी अग्रवाल ही तरुणी त्यापैकीच एक होय. नंदिनीने कमी वयात एका विक्रमाची नोंद केली आहे. हा विक्रम तिच्या शैक्षणिक यशाशी निगडीत आहे. सीएसारख्या अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या परीक्षेत नंदिनीने देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. तिने वयाच्या 19 व्या वर्षी सीएची अंतिम परीक्षा दिली आणि या परीक्षेत तिनं टॉप रँक मिळवली आहे. तिच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. नंदिनीच्या या प्रवासाविषयी सविस्तर जाणून घेऊया.

नंदिनी अग्रवाल या तरुणीला गिनीज रेकॉर्डने जगातली सर्वात तरुण महिला चार्टर्ड अकाउंटंट म्हणून घोषित केले आहे. नंदिनी मूळची मध्य प्रदेशातल्या मुरैना या छोट्या शहरातील रहिवासी आहे. सीएच्या अंतिम परीक्षेत तिने देशात अव्वल क्रमांक पटकावला आहे. जुलै 2021 मध्ये तिने






सीएची अंतिम परीक्षा दिली तेव्हा ती फक्त 19 वर्षांची होती. या परीक्षेत ती अव्वल ठरली. नंदिनीचे वडिल नरेशचंद्र गुप्ता हे टॅक्स प्रॅक्टिशनर आहेत तर तिची आई



डिंपल गुप्ता या गृहिणी आहेत.

नंदिनी अग्रवाल लहानपणापासून अभ्यासात हुशार होती. तिने शाळेत दोन इयत्ता लवकर कव्हर केल्या. वयाच्या 13

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल –subodh.ranshevre@rediffmail.com

व्या वर्षी इयत्ता 10 वीची तर वयाच्या 15 व्या वर्षी इयत्ता 12 वीची बोर्ड परीक्षा ती उत्तीर्ण झाली. वयाच्या 19 व्या वर्षी तिने अभिमानाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड देखील मिळवले. 2021 मध्ये नंदिनी चार्टर्ड अकाउंटिंगची अंतिम परीक्षा 800 पैकी 614 (76.75 टक्के) गुणांसह उत्तीर्ण झाली. तिने 83 हजार उमेदवारांना मागे टाकत अव्वल स्थान पटकवले. नंदिनी इयत्ता 11 वीत असताना गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या विक्रमवीरांनी तिच्या शाळेला भेट दिली होती. त्या क्षणी आव्हानात्मक विक्रम प्रस्थापित करण्याचा तिनं निश्चय केला. यासाठी तिने आपले सर्व लक्ष सीए परीक्षेवर केंद्रीत केले. नंदिनीला अप्रेंटिसशिप मिळणे अवघड होते, कारण लहान कंपन्या तिला वयाच्या 16 व्या वर्षी ही संधी देण्यास तयार नव्हत्या.नंदिनीने टीओआय`ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ``माझं माझ्या भावाशी चांगलं नातं आहे. त्याने माझ्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे. माझा सर्वोत्तम समर्थक आणि चीअर लीडर म्हणून मला त्याची आठवण येते.` नंदिनीच्या या अनोख्या शैक्षणिक यशाची सर्वत्र जोरदार चर्चा आहे. २५,४६८ हेल्मेट्स वितरनाद्वारे आयसीआयसीआय लोम्बार्डचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स : भारतातील सर्वात मोठी खाजगी सर्वसाधारण विमा कंपनी, आयसीआयसीआय लोम्बार्डने, १० ऑगस्ट २०२६ रोजी नवी दिल्लीत २५,४६८ हेल्मेट्सचे वाटप करून, १२ तासांत सर्वाधिक हेल्मेट्सचे वाटप करण्याचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स™ किताब पटकावला आहे. ही कामगिरी कंपनीच्या 'राइड टू सेफ्टी' या प्रमुख रस्ते सुरक्षा सीएसआर उपक्रमाचा भाग म्हणून करण्यात आली, ज्यामुळे सुरक्षित रस्ते पद्धतींना प्रोत्साहन देण्याची आणि दुचाकी व मागे बसणाऱ्यांमध्ये हेल्मेटच्या वापरास प्रोत्साहित करण्याची कंपनीची दीर्घकालीन वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे.

१० ऑगस्ट रोजी, १३ शाळांसह १४ ठिकाणी ही विक्रमी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेअंतर्गत विद्यार्थी आणि पालकांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले, तसेच आयसीआयसीआय लोम्बार्डचे वरिष्ठ अधिकारी, सरकार आणि पोलिसांमधील मान्यवर यांच्या उपस्थितीत, माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते रस्ते सुरक्षा रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.कंपनीच्या रौप्य महोत्सवानिमित्त, जबाबदार रस्ते वर्तनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि संरक्षक साधनांचा अधिक वापर वाढवण्यासाठी आमच्या दशकाहून अधिक काळाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.आयसीआयसीआय लोम्बार्ड रस्ते सुरक्षेच्या कार्यासाठी कटिबद्ध असून, जनजागृती, प्रतिबंध आणि पुनर्वसन या सर्व स्तरांवर कार्यरत आहे.२०१५ पासून, आम्ही देशभरात ७ लाखांहून अधिक हेल्मेट्सचे वाटप केले आहे आणि २५ लाखांहून अधिक लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव टाकला आहे.

असा लागला शोध : टॉर्च टॉर्चचा (फ्लॅशलाइट) शोध डेव्हिड मिसेल यांनी १८९९ मध्ये लावला. १८८७ मध्ये ड्राय सेल बॅटरीचा शोध लागला, ज्यामुळे विजेचा वापर करून पोर्टेबल (कसेही कुठेही नेण्यासारखी) उपकरणे बनवणे शक्य झाले.१८९९ मध्ये ब्रिटिश संशोधक व अमेरिकेत राहणारे डेव्हिड मिसेल यांनी हँडहेल्ड इलेक्ट्रिक टॉर्च तयार केली. त्यांनी एका नळीमध्ये (ट्यूब) ३ डी-साईज बॅटरी, एक छोटा बल्ब आणि साधारण कॉन्टॅक्ट स्विच बसवला. सुरुवातीच्या काळात वापरल्या जाणाऱ्या झिंक-कार्बन बॅटरी आणि कार्बन-फिलामेंट बल्बमुळे प्रकाश सतत आणि जास्त वेळ टिकत नसे. प्रकाश फक्त काही सेकंदांसाठी किंवा चमकांसारखा पडत असे, म्हणून त्याला उत्तर अमेरिकेत 'फ्लॅशलाइट' म्हटले गेले. डेव्हिड मिसेल यांनी या शोधाचे हक्क कॉन्ट्राड हुबर्ट यांच्या कंपनीला विकले. हुबर्ट यांनी या उपकरणात सुधारणा करून त्याला बाजारात आणले, ज्यामुळे ती लोकप्रिय झाली. पुढे हीच कंपनी 'एव्हररेडी' म्हणून ओळखली जाऊ लागली.

## व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी

# अमनोरा पार्क टाउनची पॅडकेअर हाउसिंग सोबत भागीदारी

■ पुणे (दै. संध्या)




पुण्यातील प्रमुख एकात्मिक टाउनशिपपैकी एक असलेल्या अमनोरा पार्क टाउनने, अधिक शाश्वत आणि जबाबदार निवासी समुदाय उभारण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकत, आपल्या निवासी समुदायामध्ये जबाबदार सॅनिटरी वेस्ट व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी पॅडकेअर हाउसिंग सोबत भागीदारी केली आहे.

घरगुती स्तरावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रकारांमध्ये सॅनिटरी वेस्ट हा अनेकदा दुर्लक्षित राहणारा कचऱ्याचा प्रकार आहे. वापरलेले सॅनिटरी पॅड नियमित कचऱ्यात मिसळल्यास कचरा हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर विविध आव्हाने निर्माण होऊ शकतात. असा कचरा अनेकदा लँडफिलमध्ये पाठवला जातो किंवा अशा पद्धतींनी त्याची विल्हेवाट लावली जाते, ज्या कचरा व्यवस्थापनाच्या चक्रीय दृष्टिकोनाला प्रोत्साहन देत नाहीत. या उपक्रमाअंतर्गत रहिवाशांना स्रोत स्तरावरच सॅनिटरी पॅड वेगळे करण्यासाठी आणि समुदायामध्ये बसवण्यात आलेल्या विशेष पॅडकेअर सेफबॉक्स युनिट्समध्ये त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. त्यानंतर संकलित केलेला सॅनिटरी वेस्ट पॅडकेअर च्या संरचित संकलन आणि पुनर्चक्रण प्रक्रियेद्वारे पुढे पाठवला जाईल. यामुळे हा कचरा पारंपरिक विल्हेवाटीच्या मार्गापासून दूर नेऊन संसाधन पुनर्प्राप्तीच्या दिशेने वळवला जाईल. जबाबदार कचरा व्यवस्थापनाच्या पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि रहिवाशांचा अधिक सहभाग वाढवणे, या अमनोरा पार्क टाउनच्या व्यापक प्रयत्नांचा हा उपक्रम एक भाग आहे. आवश्यक पायाभूत सुविधांसोबतच हा कार्यक्रम जागरूकता आणि वर्तनातील बदलावर देखील लक्ष केंद्रित करतो. सॅनिटरी वेस्टचे वर्गीकरण का महत्त्वाचे आहे आणि घरच्या घरी केलेल्या साध्या कृतींमुळे अधिक स्वच्छ आणि जबाबदार समुदायाच्या निर्मितीमध्ये कसा हातभार लागू शकतो, हे समजून घेण्यासाठी रहिवाशांना मदत करणे हा यामागील उद्देश आहे.

अमितकुमार सस्ते, जीएम – पर्यावरण आणि सुरक्षा, अमनोरा पार्क टाउन, म्हणाले, "शाश्वत समुदाय निर्माण करणे म्हणजे केवळ पायाभूत सुविधा उभारणे नव्हे; तर रहिवाशांना दैनंदिन जीवनातील जबाबदार पद्धतींमध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. सॅनिटरी वेस्ट हा घरगुती कचरा व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा, मात्र अनेकदा दुर्लक्षित केला जाणारा भाग आहे आणि अशा उपक्रमांमुळे या विषयावरील चर्चा आपल्या समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत होते."

पॅडकेअर हाउसिंग हे पुणेस्थित स्टार्टअप पॅडकेअर लॅब्स चे एक समर्पित वर्टिकल आहे. पॅडकेअर लॅब्स ने भारतातील पहिले सॅनिटरी पॅड पुनर्चक्रण तंत्रज्ञान विकसित केले आहे. पॅडकेअर हाउसिंग निवासी सोसायट्यांमध्ये शाश्वत मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापनाच्या पद्धतींना प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करते. स्रोत स्तरावर वर्गीकरण, समर्पित संकलन आणि पुनर्चक्रणाच्या माध्यमातून पॅडकेअर हाउसिंग समुदायांसोबत काम करत सॅनिटरी वेस्ट व्यवस्थापनासाठी अधिक जबाबदार आणि चक्रीय व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने कार्य करत आहे.

# ५०० कोटींच्या अपरिवर्तनीय रोख्यांना (एनसीडी) ७०४% अधिक प्रतिसाद


■ पुणे (दै. संध्या)




इंडेल मनी लिमिटेडच्या सुरक्षित, मानांकन प्राप्त, सूचीबद्ध आणि परतफेडयोग्य अपरिवर्तनीय रोख्यांच्या सार्वजनिक इश्यूला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २५० कोटींच्या ग्रीन शू ऑप्शनसह एकूण ५०० कोटींचा संपूर्ण इश्यू १८ ऑगस्ट २०२६ रोजी इश्यू खुला झाल्यानंतर अवघ्या चार तासांत पूर्णपणे सबस्क्राईब झाला. या इश्यूचा बेस आकार २५० कोटी असून, अतिरिक्त २५० कोटींपर्यंतची ओव्हरसब्स्क्रिप्शन कायम ठेवण्याचा पर्याय कंपनीकडे होता. निर्धारित अंतिम तारखेपूर्वीच, २० ऑगस्ट २०२६ रोजी हा इश्यू प्री-क्लोज करण्यात आला. कंपनीला १,७५९ कोटींच्या बोली (बीड्स) प्राप्त झाल्या, जी बेस इश्यूच्या आकाराच्या ७०४% इतकी आहे. ह्या अपरिवर्तनीय रोख्याचे दर्शनी मूल्य १,००० असून, त्यावर वार्षिक १२.२५% पर्यंत प्रभावी परतावा मिळणार आहे, आणि हे अपरिवर्तनीय रोखे बीएसई वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. या अपरिवर्तनीय रोख्याला इंडिया रेटिंग्स आणि रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड कडून 'IND A-/Stable' असे क्रेडिट रेटिंग देण्यात आले आहे. श्री. उमेश मोहनन, पूर्णवेळ संचालक, इंडेल मनी, म्हणाले, "या इश्यूला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा गुंतवणूकदारांनी इंडेल मनी आणि आमच्या विकासाच्या धोरणावर दाखवलेल्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे.

# डॉ. फिक्सिटने वारकऱ्यांसाठी संरक्षणाचे आपले वचन अधिक दृढ केले

■ पुणे (दै. संध्या)




पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचा वॉटरप्रूफिंग सोल्यूशन्स ब्रँड डॉ. फिक्सिट ने महाराष्ट्रातील सर्वाधिक पूजनीय आध्यात्मिक यात्रांपैकी एक असलेल्या पंढरपूर वारी 2026 मध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना सहकार्य करून घरांच्या पलीकडे जाऊन संरक्षणाचे आपले वचन अधिक दृढ केले. डॉ. फिक्सिट पंढरपूर वारी 2026 या ऑन-ग्राउंड उपक्रमांतर्गत पावसाळ्यातील वातावरणात यात्रा करणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक आरामदायी व्हावा, यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, चालते छत (Walking Roof Shades) वारकऱ्यांसोबत संपूर्ण प्रवासात होते, ज्यामुळे त्यांना पावसापासून संरक्षण मिळाले आणि मार्गात विश्रांतीचे क्षण अनुभवता आले. तसेच, तंबूंची व्यवस्था करून भाविकांना थांबून विश्रांती घेण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, तर विशेष ड्रायिंग स्टेशनमुळे पावसात भिजल्यानंतर स्वतःला कोरडे करून ताजेतवाने होण्याची सुविधा मिळाली. याशिवाय, अनिश्चित हवामानापासून अतिरिक्त संरक्षण मिळावे म्हणून रेनकोटचेही वितरण करण्यात आले, ज्यामुळे वारकऱ्यांना त्यांचा प्रवास अधिक आरामात सुरू ठेवता आला. या उपक्रमाविषयी बोलताना पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विपणन अधिकारी श्री. संदीप तनवानी म्हणाले, "पिडिलाइटमध्ये आम्ही मानतो की, जिथे लोकांना संरक्षणाची सर्वाधिक गरज असते तिथे ते पोहोचले, तरच त्याला खरा अर्थ प्राप्त होतो. यावर्षी डॉ. फिक्सिटच्या माध्यमातून आम्ही पंढरपूर वारीतील आमच्या वचनबद्धतेला आणखी एक पाऊल पुढे नेत प्रथमच मोबाईल ड्रायिंग स्टेशनची सुविधा सुरू केली आहे, ज्यामुळे पावसाळ्यात वारकऱ्यांना स्वतःला कोरडे करून अधिक सहजतेने त्यांची यात्रा पुढे सुरू ठेवता येईल. यासोबतच, चालते छत, संरक्षणात्मक रेन गिअर आणि तंबूंच्या माध्यमातूनही आम्ही यात्रेदरम्यान भाविकांना सहकार्य करत आहोत. या पवित्र परंपरेचा भाग होण्याचा आणि श्रद्धा व भक्तीच्या या अद्वितीय प्रवासात वारकऱ्यांसोबत उभे राहण्याचा आम्हाला अभिमान आहे."

या उपक्रमात ऑन-ग्राउंड अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी आर्च गेट्स,मनगटी पट्ट्या (Wristbands) आणि टी-शर्ट्स यांचाही समावेश करण्यात आला होता, ज्यामुळे संपूर्ण यात्रेदरम्यान वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सहकार्याला अधिक बळ मिळाले. गेल्या 25 वर्षांहून अधिक काळापासून, डॉ. फिक्सिटने आपल्या वॉटरप्रूफिंग कौशल्याच्या माध्यमातून भारतभरातील 1,000 कोटी चौरस फूटांहून अधिक बांधकाम क्षेत्राचे संरक्षण केले आहे. पंढरपूर वारीशी असलेल्या या सहभागाद्वारे कंपनीने संरक्षणाचे आपले वचन केवळ इमारतींपुरते मर्यादित न ठेवता लोकांपर्यंत आणि समाजापर्यंत विस्तारले असून, त्यांच्या प्रवासात अर्थपूर्ण सहकार्य करण्याची परंपरा कायम ठेवली आहे.


# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

कटिबध्दा जनहिताय

अ क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग

ई निविदा सूचना क्र. ०२/०७/२०२६-२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.

१. निविदेचा दर भरताना एकुण निविदा रक्कमेतून मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रक्कमेवर निविदा दर भरावेत.

२. प्रचलीत दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर दयावेत.

३. रॉयल्टीबाबत मनपाजे धोरण ठरवेल ते आपणावर बंधणकारक राहिल.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकुण निविदा रक्कम | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महीने) | निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १० मध्ये मंडप विषयक कामे करणे (सन २०२६-२७) | ७८७६४५ | ७८७६४५ | ० | ० | ७८७६ | ३९३८२ | १२ | १६६० |
| २ | प्रभाग क्र. १० मध्ये अतिक्रमण कार्यवाहीसाठी मशिनरी पुरविणे. (सन २०२६-२७) | ७८२१४६ | ७८२१४६ | ० | ० | ७८२१ | ३९१०७ | १२ | १६६० |
| ३ | प्रभाग क्र. १४ मध्ये मंडप विषयक कामे करणे. (सन २०२६-२७) | ७७४४०९ | ७७४४०९ | ० | ० | ७७४४ | ३८७२० | १२ | १६६० |
| ४ | प्रभाग क्र.१४ मध्ये आकुर्डी व इतर परिसरात राडारोडा उचलणे व अतिक्रमण कारवाईकरिता मशिनरी पुरविणे. (सन २०२६-२७) | ७८१२४० | ७८१२४० | ० | ० | ७८१२ | ३९०६२ | १२ | १६६० |
| ५ | प्रभाग क्र. १९ मध्ये रस्त्यांचे खड्डे व चर दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२६-२७) | ७९४२४९ | ७०८००४ | १२६६ | ८६२४५ | ७९४२ | ३९७१२ | १२ | १६६० |
| ६ | प्रभाग क्र. १९ मध्ये अतिक्रमण कारवाई व राडारोडा उचलणेसाठी मशिनरी पुरविणे. (सन २०२६ - २७) | ७८२३७७ | ७८२३७७ | ० | ० | ७८२४ | ३९११९ | १२ | १६६० |
| ७ | प्रभाग क्र. १९ मध्ये स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२६- २७) | ७८७७२५ | ७५०६६० | ५३७६ | ३७०६५ | ७८७७ | ३९३८६ | १२ | १६६० |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक : २७/०८/२०२६ ते ०२/०९/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दिनांक : ०२/०९/२०२६ दुपारी ०३.०० पर्यंत |
| निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ | :- | निरंक |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दिनांक : ०४/०९/२०२६ |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत किंवा अशंत मंजुर नामंजूर क्रण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी स्वत : कडे ठेवला आहे.निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई - निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू राहिल सविस्तर निविदा व निवेदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.1.https://www.mahatenders gov.in सदरची ई निवदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (मिलिंद रणपिसे) | (वैशाली ननावरे) | (निवेदिता घार्गे) |
| लेखाधिकारी | कार्यकारी अभिंयता(स्थापत्य) | सहा. आयुक्त |
| अ क्षेत्रिय कार्यालय | अ क्षेत्रिय कार्यालय | अ क्षेत्रिय कार्यालय |
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| निगडी - ४४ | निगडी - ४४ | निगडी - ४४ |

जाहिरात क्र. 2026-27/131

का क्र. अक्षेका/लेखा/०४/काவि/१९६/२०२६

दिनांक : २४/०८/२०२६



# महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला पुणे - ४११ ००१ यांचे कार्यालय.

ई मेल पत्ता - northpune.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५

ई-निविदा सूचना क्रमांक २२ सन २०२६-२०२७ (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२३३०५) हे सक्षम कंत्राटदार जे निवेदतील अटी व शर्तीची पूर्तता करतील अशा कंत्राटदारांकडून खालील कामांची "ब-१" नमुन्यातील निविदा ई प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर htpp://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | लांबी कि.मी. | | अंदाजित किंमत रू. लक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | १) माळवाडी-हरणस-जोगवडी-कुरूजी-मळे-भुतोंडे-खुलशी रस्ता प्रजिमा-४३ किमी ०/००० ते १५/००० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे. माळवाडी-हरणस-जोगवडी | १५.०० | २३.०० | २३.५३ |
| | २) माळवाडी-हरणस-जोगवडी-कुरूजी-मळे-भुतोंडे-खुलशी रस्ता प्रजिमा-४३ किमी १५/००० ते. २३/००० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे. | ८.०० | | |
| २ | १) माळवाडी-हरणस-जोगवडी-कुरूंजी-मळे-भुतोंडे-खुलशी रस्ता प्रजिमा-४३ किमी २३/००० ते ३१/००० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे. | ८.०० | २२.८० | २३.३३ |
| | २) माळवाडी-हरणस-जोगवडी-कुरूजी-मळे-भुतोंडे-खुलशी रस्ता प्रजिमा-४३ किमी ३१/००० ते ४०/०० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे | ९.०० | | |
| | ३) माळवाडी-हरणस-जोगवडी-कुरूजी-मळे-भुतोंडे-खुलशी रस्ता प्रजिमा-४३ किमी ४०/००० ते ४५/८०० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे | ५.८० | | |
| ३ | १) खुलशी ते वाजेघर रस्ता प्रजिमा-३३ किमी ०/०० ते ५/७०० रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे. ता. भोर, जि. पुणे. | ५.७० | २३.८० | २४.३५ |
| | २) भुतोंडे पाल वाजेघर खरीव ते रामा १०६ रस्ता प्रजिमा-३३ किमी ५/७०० ते १३/५०० रस्त्याचे रुंदीकरणासह मजबुतीकरण करणे. ता. वेल्हे, जि. पुणे. | ७.८० | | |
| | ३) कासुर्डी हातवे तांबाड चीरमोडी वेल्हे धानेप पानशेत रस्ता प्रजिमा-४२ किमी ३२/५०० ते ३८/५०० रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणे. ता. वेल्हे, जि. पुणे. | ६.०० | | |
| | ४) महाड मढे घाट वेल्हे नसरापूर चेलाडी रस्ता रामा १०६ किमी २६/२०० ते ३०/५०० रस्त्याचे मजबुतीकरण करणे. ता. वेल्हे, जि. पुणे | ४.३० | | |
| ४ | महाड मढे घाट वेल्हे नसरापूर चेलाडी रस्ता रामा १०६ किमी १३/२०० ते २६/२०० रस्त्याचे मजबुतीकरण करणे. ता. वेल्हे, जि. पुणे. (१४/७०० ते २६/२००) | १३.०० | १३.०० | १३.३० |
| ५ | १) साकुर्डे कवडेवाडी पिंगोरी रस्ता प्रजिमा १३३ कि.मी. १/५०० ते ९/१०० ता.पुरंदर जि.पुणे. रस्त्याची सुधारणा करणे | ७.६० | १७.०० | १७.३९ |
| | २) साकुर्डे कवडेवाडी पिंगोरी रस्ता प्रजिमा १३३ कि.मी. ९/१०० ते १५/५०० ता.पुरंदर जि.पुणे. रस्त्याची सुधारणा करणे | ६.४० | | |
| | ३) NH ९६५ ते तक्रारवाडी साकुर्डे रस्ता ग्रा. मा. १६५ कि. मी. ०/०० ते ३/०० मध्ये रस्ता रुंदीकरणासह सुधारणा करणे. ता. पुरंदर, जि. पुणे. (भाग साकुर्डे ते NH ९६५) | ३.०० | | |
| ६ | १) दर्याघाट आपटाळे जुन्नर रस्ता प्रजिमा ३, कि.मी. २१/०० ते ? 8/0 मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. (भाग- जुन्नर चौक ते निरगुडे फाटा) ता.जुन्नर, जि. पुणे | ३.०० | २०.४० | २०.८७ |
| | २) बोरघर तांबे बेलसर रस्ता प्रजिमा ६३, कि.मी १९/००० ते २१/२००, मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. (भाग- निरगुडे फाटा ते बेलसर) ता. जुन्नर, जि. पुणे | २.२० | | |
| | ३) डोण हातविज आंबे येणेरे पारुंडे महाळुंगे पडवळ ते कळंब रस्ता प्रजिमा ६, कि.मी. २९/००० ते ३५/००० मध्ये रस्त्याची रूंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग-राळेगण ते बेलसर) ता. जुन्नर, जि. पुणे | ६.०० | | |
| | ४) राळेगण हिवरे तर्फ मिन्हार ते प्रजिमा ६३ रस्ता प्रजिमा २३७, कि.मी.०/००० ते ९/२०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग-राळेगण ते प्रजिमा ६३) ता.जुन्नर, जि. पुणे | ९.२० | | |
| ७ | १) बोरघर तांबे बेलसर रस्ता प्रजिमा ६३, कि.मी. ०/००० ते ७/५०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग- बोरघर ते तालुका हद्द) ता. आंबेगाव, जि. पुणे | ७.५० | २३.५० | २४.०४ |
| | २) डिंभे बोरघर आहुपे बालवीरवाडी कोंढवळ ते रा.म.६० स्पुर रस्ता प्रजिमा १६५, कि.मी. १५/००० ते ३१/००० मध्ये रस्त्याची रूंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग-बोरघर ते कोंढरे) ता. आंबेगाव, जि. पुणे | १६.०० | | |
| ८ | रा.म.६१ तळेघर फलोदे म्हाळुंगे कुशिरे बु. कुशिरे खु. कोंढरे ते प्रजिमा १६५ रस्ता प्रजिमा २३९, कि.मी. ०/०० ते १८/५०० मध्ये रस्त्याची रूंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग-तळेघर ते कोंढरे) ता. आंबेगाव, जि. पुणे | १८.५० | १८.५० | १८.९३ |
| ९ | १) रा.म.६० स्पुर ते पालखेवाडी कारकुडी ते टोकावडे रस्ता ग्रामा १६७, २११, २३ कि.मी.०/००० ते ७/८०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासहित सुधारणा करणे. (भाग- रा.म.६० स्पुर ते टोकवडे) ता. आंबेगाव/खेड, जि. पुणे | ७.८० | २४.१२ | २४.६८ |
| | २) तळेघर मंदोशी भोरगिरी भिमाशंकर रस्ता राज्य मार्ग क्र.११३ (भाग -टोकावडे ते शिरगाव मोरोशी फाटा) ता.खेड, जि.पुणे. | २.१५ | | |
| | ३) उरण पनवेल भिमाशंकर वाडा खेड शिरूर रस्ता राज्य मार्ग क्र.१०३ (भाग- मोरोशी फाटा ते मोरोशी) | १.९० | | |
| | ४) भिमाशंकर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता-उरण पनवेल भिमाशंकर वाडा खेड शिरूर रस्ता रा.मा. १०३ कि.मी १४०/०० ते १४३/०० ची सुधारणा करणे ता. खेड जि.पुणे (भाग- वरची धामणगाव ते मोरोशी) | ३.०० | | |
| | ५) उरण पनवेल भिमाशंकर वाडा खेड शिरूर रस्ता राज्य मार्ग क्र.१०३ (भाग - धामणगाव घोटवडी) ता.खेड, जि.पुणे. | २.३७ | | |
| | ६) भिमाशंकर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता उरण पनवेल भिमाशंकर वाडा खेड शिरूर रस्ता रा.मा.१०३, कि.मी. १२९/२०० ते १३६/१०० ची सुधारणा करणे, ता.खेड, जि.पुणे. (भाग- कुडे बु. ते घोटवडी) | ६.९० | | |
| १० | १) उरण पनवेल भिमाशंकर वाडा खेड शिरूर रस्ता राज्य मार्ग क्र.१०३ (भाग- खरपुड म्हसेवाडी फाटा ते औंढे फाटा) | १.९० | २३.१० | २३.६४ |
| | २) भिमाशंकर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता सुपे कुडे येणवे रस्ता प्रजिमा-११ कि.मी. ०/०० ते १/८०० ची सुधारणा करणे, ता. खेड. जि. पुणे. (भाग-सुपे ते कुडे रामा १०३) | १.८० | | |
| | ३) वाद्रे आंबोली पाईट शिरोली रस्ता प्रजिमा- १६ (भाग- सुपे सातकरवाडी फाटा ते वाघू साबळेवाडी) | १.५० | | |
| | ४) भिमाशंकर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता वाद्रे आंबोली पाईट शिरोली रस्ता प्रजिमा- १६ कि.मी. १२/५०० ते १८/०० ची सुधारणा करणे, ता.खेड, जि.पुणे. (भाग- सातकरवाडी ते. हेद्रूज) | ५.५० | | |
| | ५) भिमाशंकर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता- बाद्रे आंबोली पाईट शिरोली रस्ता प्रजिमा- १६ कि.मी. १८/०० ते २४/५०० ची सुधारणा करणे, ता. खेड, जि.पुणे. (भाग- हेद्रूज ते पाईट) | ६.५० | | |
| | ६) वाद्रे आंबोली पाईट शिरोली रस्ता प्रजिमा- १६ कि.मी. २४/५०० ते २५/१०० ची सुधारणा करणे, ता. खेड, जि.पुणे | ०,६० | | |
| | ७) तळेगाव स्टेशन नवलाख उंब्रे करंजविहीरे धामने पाईट कडुस खेड गुळाणी वाफगाव लोणी रस्ता प्रजिमा १५ किमी २५/०० ते ३०/३०० मध्ये रस्त्याचे सुधारणा करणे. ता. खेड जि. पुणे. (भाग - पाईट ते कोहिंडे फाटा) ता. खेड, जि.पुणे. | ५.३० | | |
| ११ | रामा 548 डी पासून इंदोरी नाणोली तर्फे चाकण- आंबी मंगरूळ -आंबळे - निगडे - कल्हाट भोयरे रस्ता प्रजिमा २२७ किमी ७/००० ते २४/०० मध्ये रस्त्याचे रुंदिकरणासह रस्ता सुधारणा करणे. (आंबी फाटा ते भोयरे फाटा) ता. मावळ | १७.०० | १७.०० | १७.३९ |
| १२ | १) प्रजिमा ७८ ते नाणे साई घोनशेत टाकवे बु. कोंडिवडे किवळे परीटवाडी मालेगाव ते सावळा रस्ता प्रजिमा १०८ किमी ०/०० ते १३/०० मध्ये रस्त्याचे रुंदिकरणासह रस्ता सुधारणा करणे. ता. मावळ | १३.०० | २४.०० | २४.५५ |
| | २) प्रजिमा ७८ ते नाणे साई घोनशेत टाकवे बु. कोंडिवडे किवळे परीटवाडी मालेगाव ते सावळा रस्ता प्रज़िमा १०८ किमी ३२/००० ते ४३/००० मध्ये रस्त्याचे रुंदिकरणासह रस्ता सुधारणा करणे. ता. मावळ | ११.०० | | |
| १३ | १) प्रजिमा ७८ ते नाणे साई घोनशेत टाकवे बु. कोंडिवडे किवळे परीटवाडी मालेगाव ते सावळा रस्ता प्रजिमा १०८ किमी १९/७०० ते ३२/०० मध्ये रस्त्याचे रुंदिकरणासह रस्ता सुधारणा करणे. ता. मावळ | १२.३० | १८.८० | १९.२३ |
| | २) राकसवाडी उकसान पाले नामा करंजगाव कांब्रे वळक टाकवे खु ते रा.म. ४८ ला जोडणारा रस्ता प्रजिमा २२१ किमी १९/०० ते २५/५०० मध्ये रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे. ता. मावळ जि. पुणे. | ६.५० | | |
| १४ | १) कामशेत नाणे गोवित्री जांभवली कोंडेश्वर मंदिर रस्ता प्रजिमा ७८ किमी २/९०० ते ११/२०० मध्ये रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे. ता. मावळ जि. पुणे | ८.३० | १७.०० | १७.३९ |
| | २) रा.म. ४ ते कामशेत वळख सांगिसे रस्ता ग्रामीण मार्ग क्र. १ किमी ५/५३० ते ७/५३० ब) सांगिसे नेसावे खांडशी ते इजिमा ६५ जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र २४ किमी ०/०० ते ६/७०० मध्ये रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे. ता. मावळ जि. पुणे | ८.७० | | |
| १५ | १) लोणावळा घुसळखांब आंबवणे रा. मा. ११० किमी ११/८०० ते २१/८०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (टायगरं पॉइंट ते आंबवणे) | १०.०० | २४.०० | २४.५५ |
| | २) आंबवणे सालतर भांबडे पिपरी वांद्रे निवे रस्ता प्र.जि.मा. २४ कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (आंबवणे ते तैलबैल) | ७.०० | | |
| | ३) आंबवणे सालतर भांबडे पिपरी वांद्रे निवे रस्ता प्र.जि.मा. २४ कि.मी. ७/०० ते १४/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (तैलबैल ते बार्पे खु.) | ७.०० | | |
| १६ | १) आंबवणे सालतर भांबडे पिपरी वांद्रे निवे रस्ता प्र.जि.मा. २४ कि.मी. १४/०० ते २१/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (बार्पे खु. ते आहेरवाडी) | ७.०० | २२.५० | २३.०२ |
| | २) आंबवणे सालतर भांबर्डे पिपरी वांद्रे निवे रस्ता प्र.जि.मा. २४ कि.मी. २१/०० ते २८/५०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (आहेरवाडी ते निवे) | ७.५० | | |
| | ३) पानशेत तव गडले धामणहोळ ताम्हीणी रस्ता प्र.जि.मा. ११२ कि.मी. ४९/००० ते ५७/००० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (मुगाव ते ताम्हीणी) | ८.०० | | |
| १७ | १) पानशेत साईव बु मोसे बु पाथरशेत बेंबटमाळ आडमाळ पडळघर दासवे भोईनी मुगाव वरसगाव रस्ता प्र. जि. मा. १६४ कि. मी. ०/०० ते ८/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (पानशेत ते मोसे) | ८.०० | २४.०० | २४.५५ |
| | २) पानशेत साईव बु मोसे बु पाथरशेत बेबटमाळ आडमाळ पडळघर दासवे भोईनी मुगाव वरसगाव रस्ता प्र. जि. मा. १६४ कि. मी. ८/००० ते १६/००० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (मोसे ते बेंबटमाळ) | ८.०० | | |
| | ३) पानशेत साईव बु मोसे बु पाथरशेत बेंबटमाळ आडमाळ पडळघर दासवे भोईनी मुगाव वरसगाव रस्ता प्र. जि. मा. १६४ कि. मी. १६/०० ते २४/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (बेंबटमाळ ते पळसे) | ८.०० | | |
| १८ | १) पानशेत साईव बु मोसे बु पाथरशेत बेंबटमाळ आडमाळ पडळघर दासवे भोईनी मुगाव वरसगाव रस्ता प्र. जि. मा. १६४ कि. मी. २४/०० ते ३०/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (पळसे ते दासवे). | ६.०० | १९.५० | १९.९५ |
| | २) दासवे लव्हार्ड मुठा कोंढुर वरसगाव पानशेत रस्ता प्रजिमा - २७ किमी ३१/५०० ते ३८/५०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (कोंढुर फाटा ते जांभळी) (३१/५०० ते ३५/५००) | ७.०० | | |
| | ३) दासवे लव्हार्ड मुठा कोंढुर वरसगाव पानशेत रस्ता प्रजिमा-२७ किमी ३८/५०० ते ४५/००० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (जांभळी ते पानशेत) (३८/५०० ते ४३/५००) | ६.५० | | |
| १९ | १) पानशेत साईव बु मोसे बु पाथरशेत बेंबटमाळ आडमाळ पडळघर दासवे भोईनी मुगाव वरसगाव रस्ता प्र. जि. मा. १६४ कि. मी. ३०/००० ते ३५/००० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (दासवे ते मुगाव) | ५,०० | १४.४० | १४.७३ |
| | २) पाषाण सुस लवळे मुठा बहुली रस्ता रा.मा. ११५ किमी २०/०० ते २७/०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (घोटावडे फाटा ते मुठा) | ७.०० | | |
| | ३) पिरंगूट घोटावडे माण हिंजवडी मारुंजी कासारसाई रोड रा.मा. १३० किमी ०/०० ते २/४०० मध्ये सुधारणा करणे ता. मुळशी जि. पुणे (घोटावडे फाटा ते भरे) | २.४० | | |
| २० | १) पाषाण सुस लवळे मुठा बहुली रस्ता रा.मा. ११५ किमी २७/०० ते ३३/७०० मध्ये सुधारणा करणे त्ता. मुळशी जि. पुणे (मुठा ते कोंढुर) | ६.७० | १२.७० | १२.९९ |
| | २) कढदे शिवणे बेबडहोळ रस्ता प्रजिमा २८ किमी ५/८०० ते ११/८०० मध्ये सुधारणा करणे ता. मावळ जि. पुणे (शिवणे ते बेबडहोळ) | ६.०० | | |
| | एकूण | ४०३.१२ | ४०३.१२ | ४१२.४१ |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| अ. क्रं. | टप्पा | पासून दिनांक व वेळ | पर्यंत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा ऑनलाईन विक्री व सादर करण्याचा कालावधी | दि.२७.०८.२०२६ सकाळी १०.०० पासून | दि. ०४.०९.२०२६ संध्याकाळी १८.१५ वाजेपर्यंत |
| २ | ई निविदा पूर्व चर्चा बैठकीचे ठिकाण, दिनांक व वेळ | दिनांक ३१.०८.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा.मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे -१ | |
| ३ | तांत्रिक व आर्थिक ई निविदा ऑनलाईन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, पुणे यांचे कार्यालयात दिनांक ०७.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० पासून (शक्य झाल्यास) | |

संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सूचना)

२) htpp://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास दरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे कार्यालयातील सूचना फलक

*(टिप - वरील कामाबाबत कंत्राटदाराची निविदोत्तर पात्रता अजमावण्यात येणार आहे.)*

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग
पुणे ४११ ००१

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी२५०३

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाकड येथे ट्रॅव्हल्स कार्यालयाची तोडफोड

**पिंपरी : दैनिक संध्या**

वाकड येथील भुजबळ चौक परिसरात ट्रॅव्हल्सच्या कार्यालयात घुसून संगणक, प्रिंटर, वायफाय मशीन, कॅमेरा यंत्रणा तसेच मोबाईलची तोडफोड केल्याचा प्रकार समोर आला आहे. कार्यालय चालवायचे असेल तर दर महिन्याला ५० हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, अन्यथा कार्यालय चालू देणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी कार्तिक हनुमंत बारवे (वय २३, रा. सोळा नंबर कॉलनी क्रमांक १, वाकड) यांनी वाकड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार विकास काळे (वय २८, रा. म्हातोबा नगर, सम्राट चौक, वाकड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २४ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास भुजबळ चौक येथील डॉलफिन ट्रॅव्हल्सच्या कार्यालयात आरोपीने प्रवेश केला. त्याने कार्यालयातील दोन्ही संगणक, प्रिंटर, वायफाय मशीन आणि कॅमेरा डिव्हाइसची तोडफोड केली. तसेच फिर्यादीच्या हातातील दोन्ही मोबाईल फोडले. कार्यालयाचा फ्लोअर आणि टेबलचेही नुकसान केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावेळी आरोपीने फिर्यादीला भीती दाखवून इजा करण्याची धमकी दिली. तसेच दर महिन्याला ५० हजार रुपये हप्ता देण्याची मागणी करून, पैसे न दिल्यास कार्यालय चालू देणार नसल्याचे सांगितल्याचा आरोप आहे. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जाधव आणि पोलिस उपनिरीक्षक सोनुने करीत आहेत.

### अंतरवाली सराटीला पिंपरी चिंचवडमधून शेकडो मराठा बांधव जाणार

**पिंपरी : दैनिक संध्या**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर निर्णायक भूमिका घेण्यासाठी २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे होणाऱ्या निर्णय आंदोलनासाठी पिंपरी चिंचवड शहरातून शेकडो मराठा समाजबांधव सहभागी होणार आहेत. या आंदोलनात पिंपरी चिंचवड शहरातील मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक सतीश काळे यांनी केले आहे. मराठा आरक्षणाचा लढा हा केवळ आरक्षणाचा प्रश्न नसून मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांचा आणि भवितव्याचा प्रश्न आहे त्यामुळे २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथे होणारे आंदोलन अत्यंत महत्त्वाचे आहे या आंदोलनासाठी पिंपरी चिंचवडमधून मोठ्या संख्येने कार्यकर्ते व समाजबांधव अंतरवाली सराटीकडे रवाना होणार असल्याचे सतीश काळे यांनी सांगितले. सरकारने यापूर्वी अनेक वेळा मराठा समाजाला आश्वासने देऊन फसवणूक केली आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासन नको तर मराठा आरक्षणाबाबत ठोस आणि निर्णायक निर्णय हवा २९ ऑगस्टचा लढा हा आपल्या हक्कासाठीचा निर्णायक लढा आहे. पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक मराठा बांधवाने अंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली एकजूट दाखवावी असे आवाहन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे. मराठा समाजाच्या न्याय्य मागणीसाठी शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने होणाऱ्या या आंदोलनात पिंपरी चिंचवड शहरातील युवक, महिला तसेच मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असेही मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### परवाना खरेदीच्या व्यवहारात ११ लाखांची फसवणूक

**पिंपरी : दैनिक संध्या**

देशी दारू दुकानाच्या परवाना खरेदीच्या व्यवहारात ११ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी हिंजवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रायबा धनाजी बुचडे (वय ४९, रा. मारूंरी, ता. मुळशी, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार नितीन शिवाजीराव माने (रा. हत्ती चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, आरोपीने सरकारमान्य देशी दारू दुकानाच्या परवाना (अनुज्ञप्ती) १ कोटी २० लाख रुपयांना विकण्याचा व्यवहार ठरवला होता. त्यासाठी फिर्यादी व त्यांच्या साथीदारांकडून रक्कम स्वीकारण्यात आली. यामध्ये १२ लाख रुपयांचा धनादेश तसेच आरटीजीएसद्वारे काही रक्कम घेण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र व्यवहार पूर्ण न करता संबंधित परवाना इतरांना विकल्याचा आरोप आहे. फिर्यादींनी पैसे परत मागितल्यानंतर आरोपीने १ लाख रुपये यूपीआयद्वारे परत केले, तर उर्वरित ११ लाख रुपयांसाठी दिलेले दोन पोस्ट-डेटेड धनादेश बँकेत सादर केल्यानंतर ते बाऊन्स झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी हिंजवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पांचाळ करीत आहेत.

### नगरसेवक संतोष कोकणे यांच्या हस्ते एसटी सवलत कार्डचे वाटप

**पिंपरी : दैनिक संध्या**

प्रभाग क्रमांक २२ मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) वतीने देण्यात येणाऱ्या प्रवास सवलतीच्या कार्डचे वाटप नगरसेवक संतोष कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एसटी महामंडळाकडून विविध पात्र प्रवाशांना प्रवास सवलतीचा लाभ देण्यासाठी स्मार्ट कार्ड अर्थात NCMC कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. शासनाच्या विविध प्रवास सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना कार्डबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच पात्र लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला आणि इतर सवलतधारक प्रवाशांना या सुविधेचा लाभ मिळणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नगरसेवक संतोष कोकणे यांनी नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, तसेच एसटी महामंडळाच्या सवलतीच्या सुविधांचा अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. नागरिकांना शासकीय सुविधा मिळवून देण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. एसटी महामंडळाच्या NCMC स्मार्ट कार्डमुळे सवलतींची नोंद अधिक पारदर्शक होण्यास मदत होणार असून, डिजिटल पद्धतीने प्रवास सेवा उपलब्ध होणार आहे. या वेळी परिसरातील नागरिक, लाभार्थी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्ड वाटपाच्या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहता नागरिकांमध्ये या सुविधेबाबत चांगली उत्सुकता असल्याचे दिसून आले.

# शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील तंबाखू विक्रेत्यांवर कारवाई

**■ पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-२ अंतर्गत शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ आणि सिगारेटची विक्री करणाऱ्या टपऱ्यांवर विशेष कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण १९ टपऱ्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड तसेच अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक) बसवराज तेली यांच्या निर्देशानुसार ही कारवाई राबविण्यात आली. परिमंडळ-२ मधील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने ही मोहीम पार पडली. त्यामध्ये पिंपरी पोलीस ठाणे हद्दीत ३, चिंचवड पोलीस ठाणे हद्दीत २, संत तुकाराम नगर पोलीस ठाणे हद्दीत ६, दापोडी पोलीस ठाणे हद्दीत ३ आणि सांगवी पोलीस ठाणे हद्दीत ५ टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई नागरीकांच्या आरोग्यास व सुरक्षितेस प्राधान्य देत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी अशा प्रकारची कारवाई यापुढेही प्रभावीपणे सुरु राहणार असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे. ही कारवाई पोलीस उपआयुक्त संदीप आटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने केली.

## गावांच्या विकासासाठी आमदार सुनील शेळके यांनी घेतली बैठक

**■ मावळ(दै. संध्या)**

मावळ तालुक्यातील जलसंपदा विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांना गती देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे यांच्या दालनात आढावा बैठक पार पडली. तालुक्यातील धरणग्रस्त, पुनर्वसित गावे तसेच नदीकाठच्या परिसरातील विकासकामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

पवना धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावांमध्ये आवश्यक पायाभूत व भौतिक विकासकामे तातडीने पूर्ण करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच शिरे व शेटेवाडी येथील पुनर्वसनाशी संबंधित सुधारणांबाबत वेगाने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. पवना व आंद्रा धरण परिसरात आवश्यक त्या ठिकाणी बुडीत बंधारे उभारण्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

इंद्रायणी व पवना नदीकाठच्या गावांना पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पुराच्या धोक्यापासून संरक्षण मिळावे यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पूर संरक्षण भिंती उभारण्याची आग्रही मागणी आमदार सुनील शेळके यांनी केली. पुनर्वसित गावांमध्ये नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा दर्जेदार आणि टिकाऊ असाव्यात, तसेच विकासकामांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मावळ तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली कामे केवळ मंजूर होणे पुरेसे नसून ती वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे, यावर आमदार शेळके यांनी बैठकीत भर दिला. प्रत्येक विकासकामाचा बारकाईने आढावा घेत त्यातील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. धरणग्रस्त आणि पुनर्वसित नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सुविधा मिळाव्यात, नदीकाठच्या गावांचे पूरस्थितीपासून संरक्षण व्हावे आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावावा यासाठी आमदार सुनील शेळके यांचा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. मावळच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर होणारी कामे गुणवत्तापूर्ण आणि नागरिकांच्या हिताची ठरावीत, यासाठी यापुढेही बारकाईने लक्ष देण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी प्रकल्पांना गती द्या

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन शहरातील वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक सुविधा आणि नागरी व्यवस्थापन अधिक सक्षम, आधुनिक व नागरिकाभिमुख करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. शहराच्या दीर्घकालीन विकासाचे नियोजन करताना लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करून प्रत्येक महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती देण्यात यावी. तसेच नगरसदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून त्यानुसार योजनांमध्ये आवश्यक सुधारणा व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.

ऑगस्ट मधील महापालिका सभेमध्ये सुचविल्याप्रमाणे आज महानगरपालिकेच्या विविध महत्त्वपूर्ण प्रकल्प व धोरणांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये महामेट्रो फेज-२ अंतर्गत निगडी ते चाकण मार्गिका, ईआरटीएस (ERTS) बस सेवा, वाहन पार्किंग धोरण आणि सार्वजनिक शौचालय धोरण या शहराच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता. आज झालेल्या विविध सादरणीकरणास उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे, शिक्षण समिती सभापती, रवीना अंगोळकर, क्रीडा,कला,सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, तृप्ती कांबळे, आरती चौंधे, अर्चना सस्ते, अर्चना करांडे, उपस्थित होते.

## पिंपरी विधानसभा मतदारसंघातील वीज व्यवस्था अधिक सक्षम

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना अधिक सुरक्षित, स्थिर आणि अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी आमदार अमित गोरखे यांच्या सक्रिय पाठपुराव्यामुळे महावितरणकडून विविध महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. निगडी, प्राधिकरण, आकुर्डी, मोहननगर, काळभोरनगर, शाहूनगर, संभाजीनगर आदी भागांतील वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी फिडर मेंटेनन्स, नवीन GOD बसविणे, फिडर पिलर बदलणे, LT केबल टाकणे आणि पर्यायी वीजपुरवठ्याची सुविधा निर्माण करण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

महावितरण अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत आमदार गोरखे यांनी नागरिकांच्या वीजविषयक समस्या मांडून तातडीच्या उपाययोजनांच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार निगडी शाखेअंतर्गत २२ केव्ही प्रकाशगड फिडरचे संपूर्ण मेंटेनन्स करण्यात आले असून दोन नवीन GOD बसविण्यात आले आहेत. तसेच ३० डीटीसी यार्डमधील झाडांची छाटणी व साफसफाईची कामे पूर्ण झाली आहेत. प्राधिकरण शाखेत २२ केव्ही टेल्को, डी-३ आणि रसटन फिडरचे मेंटेनन्स करण्यात आले आहे. चार ठिकाणी GOD चे मेंटेनन्स, तीन नवीन GOD बसविणे, दहा खराब फिडर पिलर बदलणे, १३ ठिकाणी बॉक्स मेंटेनन्स आणि १४ डीटीसी यार्डची साफसफाई अशी विविध कामे पूर्ण झाली आहेत. गुरुदत्त मंदिर, होंडा शोरूम आणि गोदावरी शाळा परिसरात जुन्या केबल बदलून नवीन LT केबल टाकण्यात आल्या आहेत. यामुळे संबंधित भागातील वीजपुरवठा अधिक सुरक्षित आणि स्थिर होण्यास मदत होणार आहे. तसेच २२ केव्ही डी-३ फिडरमध्ये बिघाड झाल्यास २२ केव्ही टेल्को फिडरवरून पर्यायी वीजपुरवठा देता यावा.

## ‘स्वाईन फ्लू’पासून बचावासाठी महापालिकेकडून खबरदारीचे आवाहन

**■ पिंपरी(दै. संध्या)**

वातावरणातील बदलामुळे सध्या तापाच्या रुग्णसंख्येत वाढ होण्याची शक्यता असून, त्याचबरोबर स्वाईन फ्लूसारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती प्रतिबंधात्मक काळजी घ्यावी. ताप, सर्दी, खोकला, घसादुखी किंवा श्वसनाशी संबंधित लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वाईन फ्लू हा श्वसनसंस्थेशी संबंधित आजार असून सर्दी, खोकला, घसादुखी, ताप तसेच श्वसनाशी संबंधित विविध लक्षणे आढळू शकतात. वातावरणातील बदलाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

जानेवारी २०२६ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात इन्फ्लुएंझा H1N1 बाधित १९ रुग्ण आढळून आले आहेत. योग्य वेळी घेतलेला वैद्यकीय सल्ला व उपचारांमुळे या कालावधीत एकही जीवितहानी झालेली नाही. तरी नागरिकांनी आजाराच्या लक्षणांबाबत अनावश्यक भीती न बाळगता वेळे नजिकच्या मनपा दवाखाना किंवा रुग्णालयातील वैद्यकीय तपासणी करून घेणे महत्वाचे आहे, जेणेकरून आजाराचे प्रभावी व्यवस्थापन करणे शक्य होईल.

स्वाईन फ्लूपासून बचावासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी.. महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करावे: – स्वाईन फ्लूच्या विषाणूबाबत नागरिकांनी घाबरून जाऊ नये. – सर्दी, खोकला, घसादुखी, ताप आदी लक्षणे आढळल्यास तातडीने नजीकच्या महापालिका दवाखाना किंवा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा. – वारंवार साबण आणि स्वच्छ पाण्याने हात धुवावेत. – पोषक व संतुलित आहार घ्यावा. – धूम्रपान टाळावे. – शरीराला पुरेशी झोप व विश्रांती द्यावी. – शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी पुरेसे पाणी प्यावे. – आहारात लिंबू, आवळा, मोसंबी, संत्री तसेच हिरव्या पालेभाज्यांसारख्या आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करावा. – गर्दीच्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळावे. – आवश्यकता भासल्यास मास्कचा वापर करावा. – खोकताना किंवा शिंकताना नाक व तोंड रुमालाने अथवा टिश्यूने झाकावे. त्यानंतर हातांची स्वच्छता राखावी. वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे.. स्वाईन फ्लूच्या प्रतिबंधासाठी वैयक्तिक स्वच्छता राखणे, नियमितपणे हात धुणे आणि गर्दीच्या ठिकाणी अनावश्यक जाणे टाळणे महत्त्वाचे आहे. त्यासोबतच पुरेशी विश्रांती घेणे, पौष्टिक व संतुलित आहार घेणे आणि शरीर हायड्रेटेड ठेवणे.

# देहूनगरीत ‘नमामि इंद्रायणी महाआरती’ भक्तिभावात संपन्न

**■ पिंपरी (दै. संध्या)**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पावन देहूनगरीत श्रावण शुद्ध एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली ‘नमामि इंद्रायणी महाआरती’ भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाली. वारकरी, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून इंद्रायणी नदीच्या स्वच्छता, संवर्धन आणि पावित्र्य जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

“धन्य देहूगाव पुण्यभूमि ठाव । तेथे नांदे देव पांडुरंग ॥” या संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीला साजेशा वातावरणात नगरप्रदक्षिणा आणि इंद्रायणी नदीची महाआरती पार पडली. वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार आयोजित या उपक्रमात भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

इंद्रायणी नदी ही संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि वारकरी संप्रदायाच्या भक्तीपरंपरेशी जोडलेली पवित्र नदी आहे. नदीचे संवर्धन, स्वच्छता आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी तीर्थक्षेत्र संवर्धन समिती, देहू यांच्या माध्यमातून गेल्या अनेक महिन्यांपासून घाट स्वच्छता आणि सुशोभीकरणाचे विविध उपक्रम राबविले जात आहेत.





## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधण्याकरता ५ सप्टेंबरला विशेष अभियान

**चाकण : दैनिक संध्या**

विकासाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचाही समावेश असला पाहिजे यासाठी बालस्नेही गाव ही संकल्पना वित्त आयोग निधीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये मांडण्यात आली असून विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधण्याकरता शनिवार (दि.५ सप्टेंबर) पासून विशेष अभियान राबवण्यात येणार असल्यची माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता बुट्टे पाटील यांनी दिली. या अभियानामध्ये स्वतः विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी मुक्त संवाद साधला जाणार आहे. त्याचप्रमाणे ४,००० विद्यार्थ्यांना ज्ञान संस्कार ही पुस्तिका देण्यात येणार आहे. या पुस्तिके मध्ये विद्यार्थी संस्कार, व्यक्तिमत्व विकास, योगा प्राणायाम, खेळ, अभ्यास, परीक्षेची तयारी, दहावी बारावीनंतर असलेल्या शिक्षणाच्या संधी, संगणक साक्षरता, राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा योजनेची माहिती, बाल स्नेही संकल्पनेमध्ये असलेल्या उपायोजना यांसह विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा गीते आणि प्रार्थना देखील नमूद करण्यात आली आहे. मानवी विकास आणि शाश्वत विकासांमध्ये बालस्नेही गाव महत्त्वाची संकल्पना मांडण्यात आली आहे. भौतिक विकासाबरोबर बालकांचे आरोग्य पोषण शिक्षण संरक्षण सुरक्षितता आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग निश्चित करणे यामध्ये अपेक्षित आहे. म्हणूनच पाईट, आंबेठाण जिल्हा परिषद गटातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला जाणार आहे. शाळा आणि गाव विकासाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या सूचना घेण्यात येणार आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना उपयुक्त होईल असे ज्ञानसंस्कार ही हस्त पुस्तिका आणि चार हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन केले आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन पुणे जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीमध्ये जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. ही सचित्र पुस्तिका निश्चितच विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. शनिवारी (दि. ५ सप्टेंबर ) शिक्षक दिनापासून हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार असून, या उपक्रमामध्ये पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता बुट्टे पाटील यांनी केले आहे.

### बेलसर परिसरात हातात कोयते घेऊन चोरट्यांची दहशत

**जेजुरी : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील बेलसर येथे सोमवारी (दि. २४) मध्यरात्री घडलेल्या मोबाईल चोरीचे प्रकार समोर आले आहेत. 'आदित्य फॅब्रिकेशन' दुकानात झालेल्या चोरीचे थेट CCTV फुटेज हस्तगत झाले असून, यामध्ये चोरटे हातात नग्न कोयते घेऊन वावरताना स्पष्ट दिसत आहेत. याबाबत स्थानिक नागरिकांकडून मिळालेली माहिती अशी की, बेलसर येथील कोथळे चौक नजीक असलेल्या शेरी येथील विनोद जायकर यांच्या'आदित्य फॅब्रिकेशन'ची कडी उघडून कामगारांचे ४ मोबाईल लंपास केले. याशिवाय रासकर मळा येथील प्रशांत गरुड यांच्या बालसिद्धनाथ ॲग्रो हायटेक नर्सरीतील १ मोबाईल चोरट्यांनी लांबवला आहे. चोरट्यांच्या हातात कोयते असल्याने या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड घबराट पसरली आहे. हातात कोयते घेऊन फिरणाऱ्या या चोरांचा पोलिसांनी तातडीने शोध घेऊन मुसक्या आवळाव्यात, अशी तीव्र मागणी आता बेलसरकर करत आहेत.

### महाराष्ट्र आयकॉन २०२६ पुरस्कार विनोद अष्टुळ यांना प्रदान

**पुरंदर : दैनिक संध्या**

सुप्रसिद्ध साप्ताहिक आपली चळवळ व जनसंवाद न्यूज तर्फे महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांसाठी महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार २०२६ सन्मान सोहळा सोलापूर येथील शिवछत्रपती रंगभवन सभागृहामध्ये आयोजित केला होता. मंचावर महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्षा तेजस्विनी कदम, मोहोळ पंचायत समिती सभापती असलम चौधरी, जिल्हा परिषद सदस्य बालाजी नरुटे, अरुणा शिवशरण, आपली चळवळ साप्ताहिकाचे संपादक गोरक्ष गायकवाड, जनसंवाद न्यूजचे संपादक कैलास रणदिवे, आपली चळवळचे कार्यकारी संपादक पितांबर धिवार तसेच सोलापूर जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विनोद अष्टुळ यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी गेल्या चौदा वर्षापासून सातत्याने नाबाद दोनशे अठ्ठावीस कार्यक्रम घेतले आहेत. साहित्य सम्राट पुणे संस्थेच्या मार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम उद्याने, मंदिरे, ग्रंथालये, दवाखाना, सुवर्णपेढी, अनाथ आश्रम, लहान मोठे सभागृहे, पदरस्ता, गुहेत तसेच स्मशानभूमीतसुद्धा कवी संमेलने घेतली आहेत. ते शाळा, कॉलेज आणि विविध उत्सवांसाठी शब्द बोले काळजाला हा विशेष उपक्रम राबवीत असतात. अष्टुळ यांनी सर्वांसाठी खुले आणि विनामूल्य असे व्यासपीठ निर्माण केले आहे. त्यामुळे अनेक नामवंत कवी लेखक आणि साहित्यिक निर्माण झाले आहेत. अष्टुळ हे महाराष्ट्र राज्य विशेष कार्यकारी अधिकारी आहेत. भागीरथी नागरिक सहकारी पतसंस्थेचे संस्थापक संचालक असून पतसंस्थेच्या मार्फत सहकारक्षेत्रात , कामगार क्षेत्रात कामगार क्रेडिट सोसायटीच्या मार्फत, आध्यात्मिक क्षेत्रात स्वाध्याय परिवाराच्या मार्फत, कला आणि सांस्कृतिकक्षेत्रात कलाकारांसाठी कलाकार महासंघातर्फे गेली अनेक वर्ष ते अशा विविध क्षेत्रांमध्ये सातत्याने प्रामाणिक आणि निस्वार्थीपणे विविध पदांवर कार्य करत आहेत. यामुळेच त्यांना आजवर अण्णाभाऊ साठे, छत्रपती संभाजी महाराज, अटल बिहारी वाजपेयी, कुसुमाग्रज, आद्यकवी कालिदास, कवी संजीव, महाराष्ट्र भूषण, मोहम्मद रफी, टॉप टेन कवी, चतुरस्त्र कवी आणि मनपा पुणे गुणवंत गौरव असे अनेक विविध क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. यांच्या कार्याचा आढावा घेऊन साप्ताहिक आपली चळवळ व जनसंवाद न्यूज समूहाने चतुरस्त्र कवी विनोद अष्टुळ यांना मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार २०२६ प्रदान केला आहे. यावेळी खरी पत्रकारिता सर्वसामान्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य साप्ताहिक आपली चळवळ आणि जनसंवाद न्यूज करत असून या दोन्ही माध्यमांनी समाजासाठी प्रेरणादायी काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. हे खूप मोठे कार्य या समूहांनी केले आहे. असे गौरवोद्गार अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी शिक्षण, साहित्य, सहकार, कलाकार, कामगार इत्यादी क्षेत्रातील उपस्थित रसिक प्रेक्षकांनी विनोद अष्टुळ यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मिसाळ, प्रास्ताविक अजय उदाटे, यांनी तर आभार राजेंद्र माने यांनी व्यक्त केले.



# टी.बी. च्या रुग्णांना खाण्यायोग्य वस्तूंचे वाटप

**■ पुरंदर (दै. संध्या)**

ग्रामीण रुग्णालय सासवड येथे २४ ऑगस्ट २०२६ रोजी जनसेवा संकल्प फाउंडेशन यांच्या माध्यमातून आणि या कार्यक्रमाचे आयोजक जनसेवा संकल्प फाउंडेशन सदस्य श्री. राहुल खेडेकर यांच्या मार्फत सामाजिक बांधिलकी जपत सासवड परिसरातील टी.बी. च्या रुग्णांना मोफत दैनंदिन जीवनामध्ये खाण्यास वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय सासवड डॉ.गजानन अकमार, जनसेवा संकल्प फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सरोज मॅडम,डॉ.पाटील सर,डॉ. सूर्यवंशी मॅडम,श्री.अकबर,श्री. फिरोज, श्री. इभाड,श्री. विजय सोनवणे,श्री.विजयकुमार शिंदे, श्री. घोडेकर,श्री.भोसले,श्री,तांबोळी, शेख मॅडम, सुवर्णा जाधव मॅडम, श्रीम.कदम,श्रीम.राऊत, श्री.पराग जाधव, श्री.संदीप एरंडकर,श्री.दीपक गोंधळी, श्री.गुंजे ,श्री.दिनेश इनामके आणि ग्रामीण रुग्णालय सासवड मधील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

अशा संस्थानी पुढे येऊन सामाजिक कार्यात सक्रीय राहून अशी सामाजिक कामे करत राहायला हवे असे वैद्यकीय अधीक्षक यांनी सर्व स्थानिक संस्थांना आव्हान केले.




## मार्तंड देव संस्थांनच्या वतीने पठारवाडी येथे विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊ वाटप



**■ पुरंदर (दै. संध्या)**

श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांच्या सौजन्याने विश्वस्त पोपट खोमणे अध्यक्ष जेजुरी देवस्थान, जेजुरी शहरातील उद्योजक प्रशांत शहा , कोळविहिरे माजी सरपंच शांताराम घाटे माजी सरपंच , शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष सोमनाथ पिसे, अंगणवाडी मदतनीस सुषमा घाटे यांच्या हस्ते चांबळी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पठारवाडी येथील विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊ वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक सुनील गाडे यांनी केले. तर सूत्रसंचालन रोहिदास तांदळे यांनी मानले. पठारवाडी शाळेतील मुलांना खाऊ वाटप केल्याबद्दल पठारवाडी शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मार्तंड देव संस्थान जेजुरी यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## पुरंदर अध्यक्षपदी तुकाराम (बापु )खेडेकर

**■ पुरंदर (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील गुरोळी गावचे सुपुत्र, उद्योजक ,प्रसिद्ध प्रवचन व कीर्तनकार ह.भ.प.तुकाराम (बापु) महाराज नारायण खेडेकर यांची निरपेक्ष कीर्तन सेवा संस्थेच्या पुरंदर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येत आहे.

निरपेक्ष कीर्तन सेवा संस्था नाशिक संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. नाना महाराज कापडणीस, राष्ट्रीय सचिव ह. भ. प. साहेबराव महाराज गवळी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ह. भ. प. माऊली महाराज गुरव यांच्या वतीने तुकाराम महाराज यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

तुकाराम (बापु) महाराज खेडेकर हे समाजसेवी आध्यात्मिक व्यक्तिमत्व असून त्यांनी महाराष्ट्रभर प्रवचन व किर्तन सेवेद्वारे प्रबोधनात्मक कार्य केलेले आहे. तुकारामबापुंच्या कार्याची दखल घेऊन निरपेक्ष कीर्तन सेवा संस्थेने पुरंदर तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



पुरंदर तालुक्यातील मान्यवर नेते ,विविध संस्था, पक्ष ,मंडळे, संघटना यांच्या वतीने त्यांच्या परमार्थिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

पुरंदर तालुक्यामध्ये महापुरुषांची जन्मस्थळे असून प्रसिद्ध देवस्थाने सुद्धा भरपूर आहेत. येथील संपन्न अध्यात्मिक वारसा जपण्यासाठी धार्मिक क्षेत्रातील सर्व मान्यवरांना एकत्रित आणून संस्कृती प्रचार प्रसार व रक्षणासाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे तुकाराम (बापु) महाराज खेडेकर यांनी सांगितले.

## संत नरहरी सोनार महाराजांचा ८३३वा जयंती सोहळा संपन्न

**■ पुरंदर (दै. संध्या)**

संत नरहरी सोनार महाराजांच्या ८३३ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी दि.२५ ऑगस्ट रोजी सासवड येथील संत नरहरी सोनार महाराज मंदिरात भक्तिभावात अभिषेक व महापूजा संपन्न झाली.

संत नरहरी सोनार महाराजांच्या पादुकांना विधिवत अभिषेक करून पूजा अर्चा करण्यात आली. यावेळी सुवर्णकार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला सचिनशेठ महागांवकर, विजयजी महागांवकर, पद्माकर गळंगे ,विजय पालकर किशोरजी वेदपाठक, विकासजी वेदपाठक, प्रवीणशेठ महामुनी, मयूरशेठ महागांवकर, भाजपा नगरसेवक राजनभैय्या जगताप, ओंकारजी महागांवकर सचिव भाजपा यांच्यासह सासवड शहरातील सर्व सुवर्णकार व्यापारी बंधू-भगिनी उपस्थित होते.

संत नरहरी सोनार महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा आणि समाजहितासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी केला. संपूर्ण दिवस मंदिरात भजन, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



## ग्रामीण भागातील १५ वर्षापुढील निरक्षर विद्यार्थी व नागरिकांना शिक्षणाची संधी



**■ पुरंदर (दै. संध्या)**

श्री भुलेश्वर मंदिर परिसरात NILP नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत साक्षरता जनजागृती अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी श्री. कृष्णकुमार पाटील. संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. शशिकांत म्हेत्रे. सहसंचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. सतीश चौधरी. सहाय्यक संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य, श्री. रोहित यादव, प्रोग्राम कॉर्डिनेटर शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य उपस्थित होते.

या प्रसंगी श्री भुलेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळशिरस, सन ब्राईट इंग्रजी मिडीयम शाळा या शाळांच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढून, पथनाट्य आणि साक्षरता गीते सादर केली. तसेच असाक्षर नोंदणी केली.

या प्रसंगी श्री. कृष्णकुमार पाटील यांनी सर्वांना साक्षरतेची शपथ दिली आणि योजना विभागाद्वारे चालवल्या जाणाऱ्या राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा, NMMS, इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा, इतर शिष्यवृत्ती अशा विद्यार्थी लाभाच्या योजनांची तसेच नवभारत साक्षरता कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली.

या कार्यक्रमप्रसंगी पुरंदर तालुका पंचायत समितीचे सदस्य तथा माळशिरस गावचे माजी सरपंच माऊली यादव, पुरंदर तालुक्याचे गटविकास अधिकारी अविनाश थोरात, गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे,केंद्रप्रमुख उमेश नेवसे, भुलेश्वर मंदिर ट्रस्टचे संचालक मंडळ तिन्ही शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विठ्ठलवाडी शाळेत फुलला 'अभिव्यक्तीचा मोर' पुस्तकाचे प्रकाशन

**■ पुरंदर (दै. संध्या)**

भिवरी (ता. पुरंदर) गावाजवळील जिल्हा परिषदेच्या विठ्ठलवाडी प्राथमिक शाळेतील मुलांच्या अनुभव लेखनावर आधारित असलेल्या मोर पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विठ्ठलवाडीच्या शिवारात मोर आढळतात. 'मुलांनी अनुभवलेला मोर' ही या पुस्तकाची मुख्य लेखन संकल्पना असून प्रियंका निमकर्डे व श्रीनाथ कटके या विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ रेखाटले आहे.

याप्रसंगी पुरंदर पंचायत समिती सदस्या अर्चना कटके,भिवरी सरपंच मोनिका कटके, माजी सरपंच संजय कटके,चांबळी केंद्रप्रमुख दीपश्री वाणी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ कटके, उपाध्यक्ष रोहित लोणकर, संतोष कटके, ज्ञानदेव कटके, ॲड.ज्ञानेश्वर लोणकर,स्वाती कटके - दळवी आदींसह विठ्ठलवाडीकर पालक व भिवरीकर ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी शाळेच्या गुणवत्तेचे व उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

बिबट्याच्या दहशतीमुळे बुडवावी लागलेली शाळा, डोंगरातील वणव्यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, भंगार गोळा करणाऱ्या मुलांसोबत केलेली मैत्री, बाल साहित्यिक म्हणून अनुभवलेलं पुणे जिल्हा परिषदेचे बालसाहित्य संमेलन, गाय,वासरू, बकऱ्या आणि कोंबड्यांना लावलेला जीव असे विविध विषय मुलांनी लेखनातून मांडले आहेत. विठ्ठलवाडी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत २१ विद्यार्थी शिकत असून एकूण ७० पानांच्या या पुस्तकात मुलांनी दर्जेदार लेखन केले आहे. पुस्तक प्रकाशनात शाळेने सर्व मान्यवरांना तसेच ग्रामस्थांना बुके, हार याऐवजी वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी किशोर मासिक भेट दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद धायगुडे यांनी केले. मुख्याध्यापक सुनील कुंजीर यांनी आभार मानले.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात शासन सकारात्मक

मुंबई : राज्य शासन मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक असून सर्व प्रशासकीय विभागांनी मराठा समाजासंबंधित प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मराठा समाजाशी संबंधित विविध विषयांबाबत आढावा बैठक उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीस पर्यटन मंत्री शंभुराज देसाई, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, दूरदृश्य प्रणालीद्वारे न्यायमूर्ती संदिप शिंदे (निवृत्त), उपसमितीचे सचिव आप्पासो धुळाज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, वैद्यकिय शिक्षण विभागाचे सचिव धिरजकुमार, कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह, नियोजन विभागाच्या सहसचिव गितांजली बाविस्कर, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक सतिशकुमार खडके, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश रणखांब यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री विखे-पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सोयीसुविधा व सवलती मराठा समाजातील विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेतला असून सर्व विभागांनी याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. यापुढे संबंधित विभागांनी ही प्रक्रिया अधिक गतिमान करुन तातडीने क्षेत्रिय कार्यालयांना उचित निर्देश द्यावेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मराठा आरक्षण कक्षास सादर करावा.

### अग्नी व विद्युत सुरक्षा मानकांची तपासणी करा

मुंबई : राज्यातील नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देताना रुग्णालयांची सुरक्षा प्राधान्याची बाब आहे. राज्यातील सर्व शासकीय, खासगी व धर्मादाय आरोग्य संस्थांमधील फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा, इमारत बांधकाम तसेच रुग्णालयातील संबंधित यंत्राचे ऑडिट करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. शासकीय आणि खासगी रुग्णालयातील आगीच्या घटनांबाबत मंत्री आबिटकर यांनी या सूचना दिल्या. राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीतील रुग्ण स्थलांतरणाची तयारी आणि विद्युत सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आरोग्य विभागाने यापूर्वी विविध स्तरांवर परिपत्रके आणि मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार सर्व आरोग्य संस्थांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांचे नियमित मूल्यांकन करून त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.

### ऐतिहासिक स्मारके व गडकिल्ल्यांच्या संवर्धनाला गती द्या

मुंबई : राज्यातील गडकिल्ले, प्राचीन मंदिरे आणि ऐतिहासिक स्मारकांच्या संवर्धनाला अधिक गती देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून (सर्वसाधारण) उपलब्ध होणाऱ्या ३ टक्के निधीच्या तरतुदीला २०२६-२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या निधीतून तसेच विभागीय निधीतून सुरू असलेल्या संवर्धनाच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. मंत्री ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे झालेल्या बैठकीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नांदोस गढी, भगवंतगड आणि सिद्धगड यांच्या संवर्धनाबाबत बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नांदोस गढी येथे 'पुरातत्व स्थळ संग्रहालय' उभारण्यात येणार असून, त्याचे व्यवस्थापन स्थानिक ग्रामपंचायतीकडे सोपविण्यात येणार आहे. भगवंतगडाचा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल सर्व्हे करून त्याचा सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणार असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले. सिद्धगडाला 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत गड परिसरात कोणत्याही प्रकारचे बेकायदा उत्खनन अथवा खनन होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

# राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा

■ अमरावती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. (सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील). या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांक – २५ हजार रुपये, जिल्हा स्तर: प्रथम क्रमांक -५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक -४० हजार रुपये, तृतीय क्रमांक – ३० हजार रुपये, राज्य स्तर: प्रथम क्रमांक – ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक – ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये राष्ट्रीय स्तर:



प्रथम क्रमांक – ७ लाख ५० हजार रुपये द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक-२ लाख ५० हजार रुपये आंतरराष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक- ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी, राज्यस्तरावरील पहिले ३ विजेते वगळून उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.

स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाच्या प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला ganeshotsav.pldmka.co.in आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तरी समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे, यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत देशात महाराष्ट्राची दमदार कामगिरी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

शेतमालाचे मूल्यवर्धन, रोजगारनिर्मिती आणि महिला उद्योजकतेला चालना देणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत महाराष्ट्राने देशातील मोठ्या राज्यांच्या श्रेणीत अव्वल कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत महाराष्ट्राला 'सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य' या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे आयोजित दोन दिवसीय 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेबाबत आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कृषी प्रक्रिया व नियोजन विभागाचे संचालक विनायक कुमार आवटे, राज्य प्रकल्प व्यवस्थापक अमोल चिद्रावार, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बाळासाहेब बोराळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या विविध कामगिरी निकषांवर महाराष्ट्राने उल्लेखनीय यश मिळविले आहे. योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन मिळत असून, स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योगनिर्मितीला चालना मिळत आहे.

राज्यात 2021-22 पासून राबविण्यात येत असलेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत 31 हजार 746 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी 17 हजार 786प्रकल्प महिला उद्योजकांचे असून, मंजूर प्रकल्पांमध्ये महिलांचा सहभाग तब्बल 56 टक्के आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

या योजनेमुळे राज्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया क्षेत्राला मोठी आर्थिक गती मिळाली आहे. मंजूर प्रकल्पांमधून 2.64 लाख प्रत्यक्ष आणि 7.92 लाख अप्रत्यक्ष, असे एकूण 10.56 लाख मनुष्यदिन रोजगार निर्माण झाले आहेत. योजनेअंतर्गत राज्यात सुमारे 3 हजार 135 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, सुमारे 18 लाख मेट्रिक टन प्रक्रिया क्षमता निर्माण झाली आहे. लाभार्थ्यांना आतापर्यंत 715 कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. तृणधान्ये, कडधान्ये, मसाले, फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ आणि तेलबिया अशा विविध कृषी उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना या योजनेचा लाभ मिळत आहे. शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्याबरोबरच स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम योजनेच्या माध्यमातून होत आहे. यामुळे शेतकरी ते उद्योजक आणि उत्पादन ते बाजारपेठ अशी संपूर्ण मूल्यसाखळी अधिक सक्षम होत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळत आहे. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि उद्योगांना चालना मिळाल्याने ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांनाही वेग आला आहे.

ग्रामीण आणि शहरी उपजीविका अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीतही महाराष्ट्राने देशातील मोठ्या राज्यांच्या श्रेणीत सर्वोत्तम कामगिरी केली आहे. राज्य ग्रामीण उपजीविका अभियानासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर दुबे पाटील आणि अश्विनी अकुसकर यांनी पुरस्कार स्वीकारला. तर राज्य शहरी उपजीविका अभियानाचा पुरस्कार सहआयुक्त नूतन खाडे आणि राज्य अभियान व्यवस्थापक प्रसाद राजेभोसले यांनी स्वीकारला. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांसाठी शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याच्या राज्याच्या प्रयत्नांना या पुरस्कारांमुळे राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या जिल्हास्तरीय प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा नोडल अधिकारी दीपक कृष्णा गवळी आणि अहिल्यानगरचे जिल्हा नोडल अधिकारी सुधाकर बाळासाहेब बोराळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उद्योजकांना मार्गदर्शन, प्रकल्पांना चालना आणि योजनेचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यात त्यांच्या योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली.

तसेच, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा संसाधन व्यक्ती पवन काबरा यांनी देशभरात सर्वाधिक प्रकल्प मंजूर होण्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचाही विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला. केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत देशभरातील अन्न प्रक्रिया क्षेत्रातील यशस्वी उपक्रम, उद्योजकता आणि योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. केंद्र व राज्य शासनांचे वरिष्ठ अधिकारी, विविध राज्यांचे प्रतिनिधी आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते.

# "पीएमएफएमई योजनेला मिळालेला पुरस्कार ममेहनतीची पावती"

■ नवी दिल्ली,(दै. संध्या)

पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) अंतर्गत उत्कृष्ट कार्यप्रणालीसाठी महाराष्ट्राला राष्ट्रीय स्तरावर प्रदान करण्यात आलेला पुरस्कार हा राज्यातील शेतकरी, महिला, युवा, स्वयं सहायता समूह, शेतकरी उत्पादक संस्था, सूक्ष्म उद्योजका आणि कृषी विभागाच्या अथक मेहनतीची पावती आहे. या सन्मानामुळे कृषीमालाचे अधिकाधिक मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला आणि ग्रामीण रोजगाराला बळ देण्याची जबाबदारी आणखी वाढली आहे," असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) अंतर्गत उत्कृष्ट कार्यप्रणालीसाठी महाराष्ट्राला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिरागजी पासवान यांच्याहस्ते कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महाराष्ट्राच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी संचालक विनयकुमार आवटे व पीएमएफएमईचे स्टेट लीड मॅनेजर अमोल चिद्रावर उपस्थित होते.

पीएमएफएमई अंतर्गत महाराष्ट्रात ३१ हजार ९५६ मंजूर प्रक्रिया प्रकल्प आहेत. त्यापैकी महिला लाभार्थी प्रकल्पांची संख्या १७ हजार ९४१ म्हणजे एकूण प्रकल्पांच्या ५६ टक्के एवढी आहे. वैयक्तिक, ५२२ समूह आणि ७५ सामायिक पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांची एकूण किंमत अनुक्रमे सुमारे २,८९३ कोटी रुपये, ३६ कोटी रुपये आणि २१६ कोटी रुपये आहे. याशिवाय २५,००७ वैयक्तिक, ३८८ समूह आणि २५ सामायिक पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे. अनुदान वितरणाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच ४७ हजार ५४४ लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून ही कामगिरीही देशात सर्वाधिक आहे.

'बीज भांडवल' अंतर्गत स्वयं सहायता समूहांच्या ६१ हजार ३२३ सदस्यांना २२१.७७ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. या योजनेमुळे शेतमालाला प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि बाजारपेठेशी जोडण्यास चालना मिळत आहे. या प्रकल्पांमधून २.६४ लाख प्रत्यक्ष रोजगार आणि ७.९२ लाख मनुष्य दिवस अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तसेच १७.७९ लाख मेट्रिक टन प्रक्रिया क्षमता निर्माण होत असून, ४७ हजार ६८६ मनुष्यबळाला प्रशिक्षण देण्यात आले आहे. मंजूर प्रकल्पांची एकूण किंमत ३ हजार १५५ कोटी रुपये असून, पीएमएफएमई अंतर्गत ७१५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या १० जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांचा समावेश असल्याचेही कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले. हा पुरस्कार केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयाचा आणि सामूहिक प्रयत्नांचा गौरव असल्याचे त्यांनी नमूद केले.

"पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नवउद्योजकांना मोठी उभारी मिळाली असून, ग्रामीण भागातील सूक्ष्म उद्योग, रोजगारनिर्मिती आणि शेतमालाच्या मूल्यवर्धनाला चालना मिळाली आहे. या योजनेमुळे शेतकरी, महिला, युवा आणि उद्योजकांना नव्या संधी उपलब्ध होत असून, महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळत आहे. भविष्यातही या योजनेच्या माध्यमातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला अधिक गतिमान आणि सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील," असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

# नेत्रदान सामाजिक चळवळ बनवूया!

नेत्रदान ही केवळ एक सामान्य वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवी संवेदनेचे, त्यागाचे आणि सामाजिक जबाबदारीचे एक अत्यंत उदात्त रूप आहे. आपल्या मृत्युनंतरही आपले डोळे या जगात जिवंत राहून कोणाचे तरी आयुष्य उजळवू शकतात, ही भावनाच अत्यंत समाधान देणारी आहे. भारतात दरवर्षी 25 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा' साजरा केला जातो. या पंधरवड्याचा मुख्य उद्देश लोकांमध्ये नेत्रदानाबद्दल असलेली भीती आणि गैरसमजांचे निरसन करणे आणि या चळवळीत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे हा असतो. या दिनानिमित्त हा लेख...

निसर्गाने दिलेली एक अद्वितीय आणि अमूल्य देणगी म्हणजे मानवी जीवन होय. आपल्या सुंदर आणि संवेदनशील डोळ्यांमुळे या जीवनाचा खऱ्या अर्थाने आनंद घेता येतो. ऋतुचक्राचे बदलणारे विविध रंग, निसर्गाची अद्भूत जादू, सृष्टीचे विलोभनीय सौंदर्य आणि आपल्या प्रियजनांच्या चेहऱ्यावरील हास्य डोळ्यांमुळेच पाहाता येते. डोळे हे केवळ एक अवयव नसून मानवी भावना व्यक्त करण्याचे आणि बाह्य जगाशी नाते जोडणारे मुख्य माध्यम आहेत. परंतु आपण सर्वजण या निसर्गदत्त प्रकाशाचा आनंद घेत असताना नशिबाच्या किंवा वैद्यकीय कारणांमुळे अंधाराच्या सावटाखाली जगत असलेलेही अनेक लोक आहेत. ज्यांच्या आयुष्यात सूर्योदय आणि रात्रीचे चांदणे या दोन्ही गोष्टी केवळ एक न अनुभवलेली संकल्पना आहेत, त्या दृष्टिहीन बांधवांच्या अंधारमय आयुष्यात आशेचा किरण पसरवण्याचा आणि त्यांना पुन्हा हे जग स्वतःच्या डोळ्यानी 'याची देही, याची डोळा' पाहण्याची संधी देण्याचा सर्वोत्तम व पवित्र मार्ग म्हणजेच 'नेत्रदान' हा होय.

आपल्या देशात कॉर्नियल अंधत्व म्हणजेच डोळ्यातील पारदर्शक पटलाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या प्रचंड मोठी आहे. डोळ्यातील पारदर्शक पटलाला (कॉर्निया) कोणत्याही प्रकारची इजा झाल्यामुळे, संसर्ग झाल्यामुळे किंवा कुपोषण व जन्मापासूनच्या दोषांमुळे दृष्टी गमावलेल्या लोकांना 'कॉर्निया प्रत्यारोपण' या सोप्या शस्त्रक्रियेद्वारे पुन्हा दृष्टी मिळवता येते. दुर्दैवाने, भारतात नेत्रदानाची गरज आणि प्रत्यक्षात उपलब्ध होणारे कॉर्निया यांमध्ये एक खूप मोठी तफावत आहे. दरवर्षी देशात लाखांहून अधिक कॉर्नियाची गरज भासते, परंतु प्रत्यक्षात केवळ काही हजार नेत्रदानेच पार पडतात. या दरीमुळे हजारो दृष्टिहीन व्यक्तींना, ज्यांमध्ये लहान मुलांचा आणि तरुण वर्गाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे, आयुष्यभर अंधारात राहावे लागते किंवा वर्षांनुवर्षे दात्याच्या प्रतीक्षेत राहावे लागते. मृत्यू ही निसर्गाची अटळ घटना आहे. परंतु मृत्यूनंतर आपले हे मौल्यवान अवयव मातीत मिसळून जाण्याऐवजी किंवा अग्नीत भस्म होण्याऐवजी जर कोणाचे निरस आयुष्य प्रकाशमान करत असतील, तर त्याहून मोठे पुण्य कार्य किंवा जिवंतपणाचे लक्षण दुसरे कोणतेही असू शकत नाही.समाजात नेत्रदानाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असण्यामागे वैद्यकीय सुविधांची कमतरता हे कारण नसून, जनजागृतीचा अभाव आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेले गैरसमज हेच मुख्य कारण आहे. अनेक लोकांना अशी भीती वाटते की नेत्रदान केल्यामुळे मृतदेह विद्रुप दिसेल किंवा अंत्यसंस्कारास विलंब होईल. परंतु हे पूर्णपणे वास्तवविरोधी आहे. नेत्रदानाची प्रक्रिया अतिशय वैज्ञानिक, सुटसुटीत आणि सन्मानपूर्वक केली जाते. प्रशिक्षित डॉक्टरांची तज्ज्ञ टीम मृतदेहाच्या ठिकाणी येऊन अवघ्या 15 ते 20 मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण करते. यामध्ये डोळ्यातील केवळ आवश्यक असा कॉर्नियाचा भागच काढला जातो आणि त्या जागी कृत्रिम पटल किंवा कापूस ठेवून पापण्या अत्यंत काळजीपूर्वक बंद केल्या जातात. त्यामुळे चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा डाग किंवा विद्रुपपणा येत नाही. याशिवाय, पुढील जन्मात व्यक्ती अंध जन्माला येईल असा अंधश्रद्धेवर आधारित विचारही समाजातील काही घटकांमध्ये दिसून येतो. वैद्यकीय आणि अध्यात्मिक दोन्ही दृष्टिकोनातून हा विचार पूर्णपणे फोल आहे; उलटपक्षी, मृत्यूनंतर अवयवदान करून दुसऱ्याचे आयुष्य उजळवणे हा सर्वात मोठा धर्म मानला गेला आहे.नेत्रदान ही अत्यंत संवेदनशील आणि वेळेवर आधारित असलेली प्रक्रिया आहे, म्हणूनच यामध्ये वेळेचे नियोजन सर्वात महत्त्वाचे ठरते. व्यक्तीच्या मृत्युनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत नेत्रदान होणे अनिवार्य असते. जितक्या लवकर कॉर्निया काढला जाईल, तितकी त्याची गुणवत्ता उत्तम राहते आणि शस्त्रक्रिया यशस्वी होण्याची शक्यता वाढते. मृत्युनंतर नातेवाईकांनी तत्काळ जवळची नेत्र पेढी किंवा रुग्णालयाशी संपर्क साधणे आवश्यक असते. डॉक्टर येईपर्यंत मृत व्यक्तीचे डोळे उघडे राहू नयेत म्हणून त्यावर ओल्या कापसाच्या पट्ट्या ठेवाव्यात, पंखा बंद ठेवावा आणि डोक्याखाली उशी ठेवून डोके थोडे उंच ठेवावे, जेणेकरून डोळ्यांमधील रक्तप्रवाह नियंत्रित राहतो.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, मृत व्यक्तीने आपल्या हयातीत नेत्रदानाचा संकल्प केला असो वा नसो, मृत्युनंतर त्याच्या निकटवर्तीयांची संमती ही कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या अनिवार्य असते. अनेकदा व्यक्ती हयातीत फॉर्म भरते, परंतु मृत्यूच्या वेळी कुटुंबातील सदस्यांना याबद्दल माहिती नसल्यामुळे किंवा ऐनवेळी घेतलेल्या भावनावश निर्णयामुळे नेत्रदान राहून जाते. म्हणूनच, जर आपण नेत्रदानाचा संकल्प करत असू, तर त्याची स्पष्ट कल्पना आपल्या कुटुंबातील सदस्यांना देणे आणि त्यांना या निर्णयामध्ये सहभागी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.शेवटी, नेत्रदान ही केवळ काही डॉक्टरांची किंवा शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून ती एक व्यापक सामाजिक चळवळ बनली पाहिजे. आपण आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग, जसे की वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस किंवा प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नेत्रदानाचा संकल्प करून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवू शकतो. रक्तदान हे जसे श्रेष्ठदान मानले जाते, तसेच नेत्रदान हे महादान आहे. आपण या जगात नसतानाही आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून हे जग पाहू शकतो आणि कोणाच्या तरी अंधारमय विश्वात कायमचा प्रकाश पसरवू शकतो. नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येऊ या, अंधश्रद्धा व गैरसमज बाजूला सारूया, नेत्रदानाचा संकल्प करू या आणि इतरांनाही या महान कार्यासाठी प्रेरित करू या.

अतुल पांडे,
सहायक संचालक (माहिती)

## थोडक्यात पण महत्वाचे




### रेडिअन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘ओणम’ उत्साहात साजरा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

२५ ऑगस्ट २०२६ रोजी रेडिअन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये केरळचा प्रसिद्ध आणि पारंपारिक सण 'ओणम' अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेची ओळख व्हावी आणि त्यांच्यात एकतेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेत इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी एका भव्य 'फ्लोरल रांगोळी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेऊन संपूर्ण शाळा परिसर विविध प्रकारच्या सुगंधी फुलांनी आणि रंगीबेरंगी नक्षीकामांनी सजवून टाकला. शाळेने नेहमीच गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले आहे. आजच्या या स्पर्धेतही विद्यार्थ्यांमधील अफाट कल्पकता, उत्कृष्ट सांघिक कार्य आणि व्यवस्थापन कौशल्य पाहायला मिळाले. या उत्सवाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता १ ली ते १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या टिफिनमध्ये खास पारंपारिक दाक्षिणात्य भोजन आणले होते. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत इडली, डोसा, वडा आणि उत्तम सांबार अशा विविध पदार्थांचा आस्वाद घेत सहभोजनाचा आनंद लुटला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ खाद्यसंस्कृतीची देवाणघेवाण झाली नाही, तर एकत्र राहण्याची आणि वाटून घेण्याची सुंदर सवयही दृढ झाली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. उपप्राचार्य श्री. लक्ष्मीकांत गुंडारगी सर आणि प्राचार्य सौ. वर्षा मदभावीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### कोळविहिरे येथे भरदिवसा साडे नऊ तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील कोळविहिरे येथील घाटेमळा परिसरात अज्ञात चोरट्यांनी घराचे पत्र्याचे पान उचकटून घरात प्रवेश करत तब्बल साडे नऊ तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी केली आहे. जुन्या बाजार भावानुसार ४ लाख ८५ हजार रुपये किमतीचे हे सोन्याचे दागिने होते. याबाबत जेजुरी पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कोळविहिरे नजिक घाटे मळा येथे महादेवी संतोष घाटे यांच्या घराचे पत्र्याचे पान अज्ञात चोरट्यांनी उचकटून कपाटातील सोन्याची ठसनी, राणी हार, अंगठी, कर्णफूले, वेल, टॉप्स असे साडे नऊ तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. हा चोरीचा प्रकार काल दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान ही घरफोडी झाल्याची तक्रार जेजुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. शेतातील काम आटोपून घाटे कुटुंबीय सायंकाळी घरी परतल्यानंतर घराचे पत्र्याचे पान उचकटलेले आणि हुक खाली पडलेला दिसून आला. कपाटाची तपासणी केली असता सोन्याचे दागिने गायब असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध जेजुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. गेल्या एक महिन्यात जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील ग्रामीण भागात सहा ते सात घरफोडीचे प्रकार घडले असून या घरफोडीत लाखो रुपयांचे सोन्या चांदीचे दागणीने, दुचाकी वाहने चोरट्यांनी चोरून नेले आहेत. अद्याप चोरट्यांचा शोध न लागल्याने नागरिकांच्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



### महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयतील विद्यार्थ्यांचा सहभाग

**राजगुरूनगर : दैनिक संध्या**

राज्यस्तरीय टेनीकॉइट (रिंग टेनिस) स्पर्धेत राजगुरुनगर येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. टेनीकॉइट (रिंग टेनिस) असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब संतोजी थोरात क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विद्यालयातील एकूण ५ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये ३ मुले व २ मुली यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने सातत्यपूर्ण मार्गदर्शन व सराव देण्यात आला. क्रीडा विभाग प्रमुख वर्षा गुट्टे, नितीन वरकड, अशोक सांडभोर व दीपक चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे तांत्रिक ज्ञान, सराव, शिस्त व स्पर्धेची तयारी याबाबत मार्गदर्शन केले. स्वरूप दत्तात्रय येवले — इ. ८ वी ‘जे, संभव मनोज राक्षे — इ. ८ वी ‘जे,स्वराज संदेश जाधव — इ. ८ वी ‘जे, प्रणिती संदीप कारभळ — इ. ९ वी ‘ड’, तेजश्री सुधीर दसगुडे — इ. ९ वी ‘जे. सहभागी विद्यार्थी चे संस्थेचे अध्यक्ष श्री हरिभाऊ शेठ सांडभोर उपाध्यक्ष अजित शेठ लुनावत सचिव एअर कमोडर जोशी साहेब व सर्व संचालक व अधिकारी वर्गाकडून अभिनंदन केले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांचे *व्यवस्थापकीय अधिकारी श्री. कैलास पाचारणे, प्राचार्या श्रीमती रेखा जाधव, उपमुख्याध्यापक श्री. सोपान निसरड, पर्यवेक्षक श्री. हौशीराम मुठे श्री. सुनिता ठाकूर तसेच विद्यालयातील सर्व अधिकारी वर्ग यांनी अभिनंदन केले.* विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेऊन विद्यालयाचे नाव क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा अधिकारी वर्गाने दिल्या. महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा विभागासाठी हा सहभाग निश्चितच अभिमानाची बाब असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राला विद्यालयाकडून सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.



# सेवानिवृत्त गणित व विज्ञान शिक्षकांचा कृतज्ञतासन्मान सोहळा संपन्न

■ **जुन्नर (दै. संध्या)**

जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने तालुक्यातील सेवानिवृत्त गणित व विज्ञान शिक्षकांचा कृतज्ञतासन्मान सोहळा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये तालुक्यातील विविध शाळांतील सेवानिवृत्त एकूण 18 शिक्षकांचा विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल देऊन सत्कार करण्यात आला असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष प्रवीण ताजणे यांनी दिली

या कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळाचे प्रवक्ते महेंद्र गणपुले, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे माजी उपाध्यक्ष तबाजी वागदरे जुन्नर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अशोक काकडे माशेलकर स्वरूप स्पेस अँड इनोवेशन सेंटरचे सचिव डॉ. रतिलाल बाबेल, संचालक तानाजी वामन, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष पंकज घोलप, जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघाचे माजी उपाध्यक्ष व मुख्याध्यापक संघाचे माजी उपाध्यक्ष वाय. बी. दाते यांसह जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघाचे सर्व कार्यकारी सदस्य सेवानिवृत्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने केला सन्मान हा राज्य व राष्ट्रीय पुरस्कारापेक्षाही मोठा असल्याचे भावना यावेळी सेवानिवृत्त शिक्षकांच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब कवडे यांनी व्यक्त केली. यावेळी सेवानिवृत्त शिक्षकांपैकी तबाजी वागदरे, बाळासाहेब कवडे, एस सी पटेल, विठ्ठल भोर,शेख याकूब, दत्तात्रय डमाळे आदी शिक्षकांनी संघासाठी भरघोस अशी देणगी दिली. तबाजी भाऊसाहेब वागदरे, याकूब शेख, भास्कर रामभाऊ गोल्हार, शामशुद्दीन चांद पटेल, ज्ञानेश्वर विठ्ठल पानसरे, दत्तात्रय देवराम डमाळे

स्नेहल यशवंत दाते, धोंडीभाऊ शंकर शिंदे, बाळासाहेब दत्तात्रय कवडे, रघुनाथ बाबुराव पोंदे, चौरे नवनाथ शिवाजी, अनिल किसन उकिरडे, विठ्ठल बापू भोर, रामदास बबन डुंबरे, धोंडीभाऊ बाबुराव मानकर, जयवंत गाडेकर, अभय पानसरे आदी शिक्षकांचा यावेळी जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापक संघाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्रम प्रसंगी जुन्नर तालुका व गणित अध्यापक संघाचे सचिव प्रकाश जोंधळे खजिनदार बी के नलावडे, व्यंकट मुंढे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर केंद्रे, प्रशांत शेटे, सहसचिव सोमनाथ सोनवणे, जिल्हा प्रतिनिधी सुरेश कसार, संजय कुटे, तालुका समन्वयक प्रमोद जाधव, योगेश शेळके, ज्ञानेश्वर सस्ते गवते एस एस, अविनाश शेटे वीरेंद्र काळे, तसेच महिला सदस्य सविता ताजणे, संगीता गाडेकर, रुपाली आवारी, तेजल वायाळ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शेटे, प्रास्ताविक प्रवीण ताजने, सत्कार वाचन प्रकाश जोंधळे यांनी तर आभार तेजल वायाळ यांनी मानले.

## अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनीचे उल्लेखनीय यश

■ **सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषद, पुणे (शिक्षण विभाग) व पंचायत समिती, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी 'अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६' आयोजित करण्यात आला. या विज्ञान मेळाव्यात ‘भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७’ या विषयावर तालुकास्तरीय उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेत शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल, सासवड येथील विद्यार्थिनी कुमारी आर्या शेखर मोरे हिने सहभाग नोंदवत अत्यंत प्रभावी सादरीकरण केले.



आर्या मोरे हिने सादर केलेल्या प्रकल्पाची आणि तिच्या सादरीकरणाची दखल घेत तिला प्रथम क्रमांक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. पुरंदर तालुक्यातील एकूण ४५ शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि नवोपक्रमाची आवड निर्माण व्हावी, या प्रमुख उद्देशाने या विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती, पुरंदरचे गट शिक्षणाधिकारी आर आर बामणे उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव नंदकुमार सागर, पुरंदर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे, सचिव भारती झुरंगे आणि कार्याध्यक्ष इस्माईल सय्यद यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थिनी कुमारी आर्या शेखर मोरे हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल, सासवडचे व्यवस्थापन, प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, उपप्राचार्य सुषमा रासकर, विज्ञान विभाग प्रमुख उज्वला जगताप, सर्व शिक्षकवृंद, पालकांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव संजय जगताप, ट्रस्टी सोनाली शिंदे, सहसचिव डी. एन. गवळी, व्यवस्थापक रविंद्रपंत जगताप, कानिफनाथ आमराळे, रेणुका सिंह मर्चंट यांनीही आर्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## इको फ्रेंडली उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासह विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाला वाव

■ **कोरेगावमुळ(दै. संध्या)**

साने गुरुजी शिक्षण संस्था, हडपसर संचालित नूतन माध्यमिक विद्यालय, वडकी येथे इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘इको फ्रेंडली’ उपक्रमांतर्गत गणेशमूर्ती रंगकामाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तब्बल ८० गणेशमूर्तींना आकर्षक रंगसाज केला. विद्यालयातील इको फ्रेंडली विभागाचे प्रमुख संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व समजावे, पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, हा उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या उपक्रमासाठी विद्यालयातील शिक्षिका रेखा आबनावे यांनी त्यांचे माजी विद्यार्थी महेश कुंभार यांच्याकडून गणेशमूर्ती तयार करुन घेतल्या. विद्यार्थ्यांनी या मूर्तींवर विविध रंगांचा कलात्मक वापर करुन आकर्षक रंगकाम केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या रंगीबेरंगी गणेशमूर्तींनी विद्यालय परिसराचे वातावरण प्रसन्न झाले. या उपक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शोभा शिंदे यांनी विशेष सहकार्य व मार्गदर्शन केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे पर्यावरण संवर्धन, कलात्मकता आणि गणेशभक्तीचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.




## आळंदीत भगवान जिव्हेश्वर जयंती महोत्सव उत्साहात साजरा

■ **आळंदी (दै. संध्या)**

भगवान जिव्हेश्वर जयंती महोत्सव विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सकाळी ग्रंथवाचन, भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव, हळदीकुंकू समारंभ तसेच वारकरी भजनाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी वारकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी स्वकुळ साळी ज्ञाती गृहाचे अध्यक्ष अमित उगले, उपाध्यक्ष मनोहर दिवाणे, माजी नगरसेवक विष्णू वाघमारे, मृदूल भोसले, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस नंदकुमार वडगावकर, शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील, पद्मराज रानवडे, महादेव पाखरे, महेश जाधव आदी उपस्थित होते. धार्मिक वातावरणात झालेल्या या जयंती महोत्सवात भाविक, वारकरी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





## दिशा फाउंडेशनकडून खामगाव शाळेतील १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅगचे वाटप

■ **जुन्नर (दै. संध्या)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामगाव येथे डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह फॉर सेल्फ हेल्प अँड अवेकनिंग (दिशा), पुणे यांच्या वतीने शाळेतील १०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला दिशा फाउंडेशनच्या विश्वस्त इंदू गुप्ता, प्रदीप गुप्ता, सुनीता थोरवे तसेच प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण भोईरकर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी दिशा फाउंडेशनच्या वतीने विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून खामगाव शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

यावेळी पल्लवी सुशील घोलप यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचणी येऊ नयेत, यासाठी सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. खामगाव शाळेतील विद्यार्थी इस्रो, नासा यांसारख्या विविध शैक्षणिक उपक्रम व परीक्षांमध्ये सहभागी होऊन यश मिळवत आहेत, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश घोलप यांनी दिशा फाउंडेशनच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले. या उपक्रमासाठी श्री. अंकुश कोकणे सर यांनी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅग उपलब्ध झाल्याबद्दल शाळेच्या वतीने दिशा फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून मेहनत घ्यावी, आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करावी आणि जीवनातील ध्येय पूर्ण करावे, असे आवाहन करण्यात आले. इस्रोच्या अंतराळ संशोधन संस्थेला भेट देण्यासाठी निवड झालेल्या शौर्य जितेंद्र नेहरकर याचे दिशा फाउंडेशनच्या विश्वस्त इंदू गुप्ता यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक तानाजी तळपे, राममामा पठारे, रेश्मा घोलप, मनिषा घोलप तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप लोहकरे सर यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक तानाजी तळपे सर यांनी मानले. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दिशा फाउंडेशनने दिलेले हे योगदान निश्चितच प्रेरणादायी असून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी या सहकार्याबद्दल शाळेच्या वतीने दिशा फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.